रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

वर्ष : १ अंक : ९

# साद

सप्टेंबर २०१८

# महिला खेळाडूंची सुवर्णझेप



महाराष्ट्र राज्य महिला आयोग

# अंतरंग...




मानसिकता बदलली पण **दुबळेपणा** कायम
पान ४

भारतातील दुसऱ्या महिला डॉक्टर
**कोल्हापूरच्या कृष्णाबाई केळवकर**
पान १५

महाविद्यालयातील नकोसे
**गॉसिपिंग...**
सिंगल वुमन म्हणून राहणाऱ्या साधना मॅडमना कॉलेजातील सहकारी प्राध्यापकच त्रास देत होते. आयोगाकडे तक्रार आल्यानंतर याबाबत सर्व संबंधितांशी बोलून मार्ग काढण्यात आला.
पान २२

**बाईच्या फँटसीची 'फँटॅस्टिक' गोष्ट...**
पान २९




// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# साद

**मुख्य संपादक**
विजया रहाटकर

**कार्यकारी संपादक**
डॉ. मंजूषा मोळवणे

**सहायक संपादक**
कपालिनी सिनकर

**प्रकाशक**
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
पोटमाळा, गृहनिर्माण भवन
कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
फोन : ०२२-२६५९०८७८

**मुद्रक**
आशुतोष प्रेस, ए२/२६४,
शाह आणि नहार औद्योगिक वसाहत,
एस. जे. मार्ग, लोअर परळ, मुंबई-१३

**वाचक संपर्क :**
saad.mscw@gmail.com

**आयोगाशी संपर्क :**
mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
www.vijayarahatkar.co.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
Tejaswini App

**'सुहिता' हेल्पलाइन**
**७४७७७२२४२४**

**स्वागत मूल्य : ₹ १०**
**वार्षिक स्वागत मूल्य : ₹ १००**

# संपादकीय



## स्त्री सर्जनाचा काळ


श्रावण नुकताच संपला. आबालवृद्धांचा लाडका गणपती येणार आहे, पाठोपाठ गौरींचे (काही भागात यांना महालक्ष्म्याही म्हणतात.) आगमन होईल. ते संपते न संपते तोवर नवरात्र येई. लगोलग दसरा आणि ही सगळी धामधूम संपेपर्यंत दिवाळीची प्रसन्न पहाट उजाडेल.

गृहिणी असोत वा नोकरदार साऱ्याच महिलांसाठी हा काळ म्हणजे लगबगीचा, आनंदाचा आणि सर्जनाचा काळ. श्रावण तर व्रत वैकल्यांचा महिना. गौरी-गणपतीला रात्र-रात्र खपून आरास करायची. त्यात आपले सारे कलाकौशल्य ओतायचे. नवरात्र तर स्त्री शक्तीचाच सण. शेतीचा शोध लावणाऱ्या महिलेच्या गौरवाचा सोहळा. सुप्रसवतेमुळेच भूमीलाही स्त्री लिंगी उल्लेखले जाते.

स्त्री ही जात्याच सर्जनशील असते. कुटुंब, समाज या साऱ्याच ठिकाणी ती आपल्या सर्जनशीलतेचे दर्शन घडवित असते. मुलगी, पत्नी, आई अशा विविध भूमिका बजावत असते. प्रत्येक भूमिका तितक्याच निगुतीने निभावत असते. साऱ्याचा तोल सांभाळत असते. हे सारे करताना ती आपले घर, मुले घडवित असते. त्यांच्यासमोर आदर्श ठेवीत असते. एकाच वेळी आपल्या सर्जनशीलतेचे अनेक प्रकारांनी ती दर्शन घडवित असते. स्त्रीच्या सर्जनशीलतेची अभिव्यक्ती आणि सन्मान अशा रूपाने या काळाकडे पाहता येते. मात्र, हा सन्मान काही दिवसांपुरता, काही महिन्यांपुरता मर्यादित राहू नये. तो कायमस्वरूपी राहावा, अशी अपेक्षा केली तर वावगे ठरू नये.

स्त्रियांच्या सर्जनशीलतेचा उल्लेख करतानाच एका अत्यंत महत्त्वाच्या विषयाकडे मी आपले लक्ष वेधू इच्छिते. कुपोषण ही आपल्यासमोरील गंभीर समस्या आहे. स्वातंत्र्यानंतर ७२ वर्षे होऊनही या आपण कुपोषणाचे निर्मूलन करू शकलेलो नाही. ही बाब लाजिरवाणी आहे. कुपोषणावर मात करण्यासाठी केंद्र सरकारने सप्टेंबर महिना पोषण मास म्हणून साजरा करण्याचे जाहीर केले आहे. या महिन्यांत कुपोषणाविरोधात जनजागृती करण्यात येणार आहे. मात्र, त्याहीपलीकडे जाऊन या समस्येविषयी विचार करणे आणि कृती करण्याची गरज आहे.

या महिन्यात आपण आपल्या परिसरातील, आपल्या शहरातील, गावातील कुपोषित बालके, माता यांच्यासाठी काही करू शकलो, तर देशासाठी ते मोठे अमूल्य योगदान ठरेल. विशेषतः आदिवासी भाग, मेळघाट, पालघर जिल्हा येथे काम करणाऱ्यांसाठी हे मोठे आव्हान आहे. त्याचबरोबर अलीकडे शहरांमध्येही कुपोषित बालके आढळून येत आहेत. ही समस्या वेगळीच आहे. अयोग्य आणि अपायकारक अन्न खाल्ल्यामुळे कुपोषण होते. या पोषण मासानिमित्त आपण सर्वांनी कुपोषणमुक्तीचा निर्धार करू या.



**विजया रहाटकर**, मुख्य संपादक आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

वाचकांना निवेदन
'साद' हे महिला आयोगाचे मुखपत्र असले तरी, येथे प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक लेखांशी आयोग सहमतच असेल, असे नाही.



# मानसिकता बदलली; पण दुबळेपणा कायम

अंधश्रद्धारूपी अंध:काराच्या या विळख्यात अडकणाऱ्यांमध्ये महिलांचीच संख्या अधिक का? काय आहे श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील सीमारेषा! अंधश्रद्धेमुळे उचललेले एक पाऊल अखेर कुठे नेते आणि यातून परतीचा मार्ग आहे का? याची उकल करण्याचा हा प्रयत्न...

**प्राची एक्के** prachi.ekke@gmail.com


एकविसाव्या शतकातही अंधश्रद्धा निर्मूलनासाठीच्या चळवळीला तीव्र विरोध सर्वसामान्यांकडूनच अधिक होत आहे. म्हणजे शिक्षणाने सर्वसामान्य समाजात अजूनही वैज्ञानिक दृष्टिकोन पूर्णपणे रुजलेला नाही, असेच म्हणावे लागेल. दुर्दैवाची बाब म्हणजे, यात महिलांची संख्या लक्षणीय आहे. सुधारणांचा स्वीकार करण्याची मानसिकता महिलांमध्ये उच्च शिक्षणामुळे आली यात शंकाच नाही. ठाम आणि निश्चित अशी स्त्रीवादी भूमिका घेणारी सुशिक्षित महिला आपल्या कर्तबगारीने समाजात मान-सन्मानाचे जीवन जगू लागली हेही खरे, परंतु ती मनानेही तितकीच कणखर झाली का? ती पूर्णपणे जागरूक आहे का? आजही ती अडचणीत सापडल्यावर सारासार विचार करते का? की, कशाच्या तरी आहारी जाते? अवलंबून राहते कोणावर तरी? महिलांची मानसिकता बदलली हे खरे पण, मनाचा दुबळेपणा अजूनही संपूर्णपणे गेलेला नाही. त्यामुळेच बऱ्याचदा अशावेळी ती अडकते एखाद्या विळख्यात. मग स्वतःसाठी आणि कुटुंबासाठीही उचलते घातक पाऊल! अंध:काराकडे नेणारे...

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

दिल्लीत एकाच कुटुंबातील ११ जणांचे मृतदेह टांगलेल्या अवस्थेत सापडल्याने सगळेच हादरून गेले. या मृत्यूंमागे एखाद्या आध्यात्मिक शक्तीच्या मागे धावण्याची इच्छा किंवा काळी जादू करण्याचा उद्देश होता, असे तपासात स्पष्ट झाले. या घरात सापडलेल्या एका डायरीतील नोंदींनुसार, या सामूहिक आत्महत्येचा दिवस आणि वेळही ठरली होती. पोलीस तपासात या घरात सुसाइड नोट मिळालेली नाही, पण जिथे सर्व मृतदेह लोंबकळलेल्या अवस्थेत होते, त्या खोलीच्या शेजारच्या खोलीत एक डायरी आणि मोठे रजिस्टर सापडले. यात अलौकिक शक्ती, मोक्ष मिळवण्यासाठी मृत्यू हेच एक द्वार आहे, आत्म्याचे अध्यात्माशी नाते अशा चित्रविचित्र गोष्टी लिहून ठेवल्या होत्या. या डायरीत लिहिले होते, 'मोक्ष प्राप्त करायचा असेल तर जीवनाचा त्याग करायला हवा. जीवनाचा त्याग करण्यासाठी मृत्यूला कवटाळले पाहिजे. मरण पत्करण्यासाठी त्रास होईल. त्रास होऊ नये म्हणून डोळे बंद करायला हवेत.' या डायरीत शेवटचे लिखाण २६ जूनचे आहे. यात असेही लिहिले होते, की 'जर आपल्याला परमात्म्याला भेटायचे असेल तर आपण सर्व हात, पाय, तोंड पूर्ण बांधू जेणेकरून कोणाचे काही ऐकू येणार नाही.'

अंधश्रद्धेच्या आहारी गेल्याने सामूहिक आत्महत्येची घडलेली ही घटना हादरवून टाकणारी आहे. ही घटना अलीकडेच घडल्याने तिचा सुरुवातीलाच सविस्तर उल्लेख केला आहे, पण अशा असंख्य घटना आपल्या आजूबाजूला सतत घडत असतात, ज्यात केवळ अंधश्रद्धेमुळे अनेक लोकांनी जीव गमावले आहेत. अनेकांनी आपले संसार उद्ध्वस्त होताना पहिले आहेत तर अनेकांनी ते स्वतः आपल्या हाताने उद्ध्वस्त केले आहेत. यात महिलांची संख्या तुलनेने खूपच जास्त आहे. कोणत्याही घरातील महिला ही खरे तर त्या घराची रक्षक असते, आधार असते आणि जेव्हा तीच अशाप्रकारे अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन आपल्या संसाराची, मुलांची, घराची भक्षक बनते, घराच्या वाताहातीसाठी कारण बनते, त्यावेळी या घटना भीषण वाटतात. अविश्वसनीय वाटतात आणि अंतर्मुख करायला भाग पाडतात. आताच्या या आधुनिक, वैज्ञानिक युगात अशा घटना ऐकल्या की सुन्न व्हायला होते. असे म्हणण्याचे महत्त्वाचे कारण असे, की आपल्याला बऱ्याचदा वाटते यात बळी पडणाऱ्या महिला या अशिक्षित किंवा ग्रामीण भागातल्या असतात. वस्तुस्थिती अशी नाही. अंधश्रद्धेची शिकार ठरणाऱ्यांत शहरी आणि उच्चशिक्षित महिलांचे प्रमाणही अधिक आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून मिळालेल्या माहितीनुसार, आपल्या देशामध्ये स्त्रियाच अंधश्रद्धेच्या सर्वांत जास्त बळी ठरतात आणि त्याच वेळी त्या अंधश्रद्धा पसरविण्याचे कामही करीत असतात. ही गोष्ट लक्षात घ्यायलाच हवी. म्हणजे स्त्रियांची ही म ानसिक गुलामगिरी नाहीशी करता येईल. अनेक स्त्रियांच्या मनातील अंधश्रद्धा फार खोलवर रुजलेल्या असतात. त्याची कारणे अनेक आहेत. पुरुषांपेक्षा त्यांना बऱ्याच जास्त आपत्ती आणि अडचणी, पराजय आणि निराशा यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे त्यांच्या



मनामधे अगतिकतेची भावना फार जास्त असते आणि त्यामुळे त्या जास्त अंधश्रद्ध असतात. तसेच आपला समाज पुरुषप्रधान आहे हे दुसरे कारण. एक चांगला नवरा आणि मुलगा असणे हेच स्त्रीच्या जीवनाचे सार्थक असतं असं ती मानते. जगातील सर्वच धर्मांनी स्त्रियांना दुय्यम दर्जा दिलेला आहे. त्याच प्रमाणे नोकरी-धंदा किंवा इतर काही कमाईचं साधन नसणे, लैंगिक छळ सोसावा लागणे, पुरुषांच्या बरोबरीने काम करूनही त्याच कामाचा पुरुषांपेक्षा मोबदला कमी मिळणे, मालमत्तेमधे हक्क नसणे आणि जाहिरातींमधे भोगवस्तू असल्यागत स्त्रीचे चित्रण होणे, या सर्व गोष्टी स्त्रीच्या आत्मसन्मानाला ठेच पोचवितात. त्यामुळे ती अंधश्रद्धांच्या गर्तेमधे ढकलली जाते, असे या समितीती ल कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

या अंधश्रद्धेच्या गर्तेतून तिला बाहेर काढण्यासाठी काही ठोस उपाययोजना आवश्यक आहेत. जसे की, स्त्रियांचे शिक्षण हे केवळ करिअरपुरते मर्यादित न राहता त्या स्वतंत्रपणे आणि सारासार विचार करू शकतील, असे असावे. म्हणजे सर्व घटनांमागचा कार्यकारण संबंध समजणे आणि शोधणे याची सवय स्त्रियांना लागली पाहिजे; असे झाल्यास त्या प्रत्येक रीत, प्रत्येक परंपरा, प्रत्येक कर्मकांड तपासू लागतील आणि त्यातले आपल्याला काय हवे आणि काय नको हे स्वतःच ठरवून नको असलेल्या गोष्टींचा निर्भीडपणे त्याग करतील. तसेच स्त्री-पुरुष विषमता नाहीशी करण्यासाठी प्रथम स्त्रियांनी स्वतःला कमी लेखणे बंद करायला हवे आणि आपल्या बुद्धीची कुवत आणि स्वतःमधे असलेल्या इतर क्षमतांचा जास्तीत जास्त विकास करायला हवा. घराघरांतूनही मुलगा आणि मुलगी यांना एकसारखी वागणूक मिळायला हवी. त्यामुळे मुलांच्या मनामधे उत्पन्न होणारा अहंगंड आणि मुलींच्या मनात उत्पन्न होणारा न्यूनगंड



टळेल. स्त्रियांना त्यांची एक व्यक्ती म्हणून स्वतंत्र ओळख असावी. स्त्री कोणाची तरी पत्नी, मुलगी किंवा अशीच काही परावलंबी व्यक्ती म्हणून ओळखली जाऊ नये. स्त्रिया कुटुंबातील व्यक्तींच्या आरोग्याची जेवढी काळजी घेतात तेवढी काळजी त्यांनी स्वतःच्या प्रकृतीचीही घेतलीच पाहिजे. घरातील स्त्री आणि इतर कुटुंबीय या सर्वांनाच योग्य आहार, स्वच्छता, वेळच्यावेळी प्रतिबंधक लस व गरज असतील ती औषधे तसेच पुरेशी विश्रांती याची नितांत गरज असते. कारण याचा परिणाम त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर होत असतो. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुले लहान असतानाच त्यांच्यामधे वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याची नितांत गरज आहे. त्यातूनच त्यांचा विवेक आणि विधायक वृत्ती पोसली जाईल आणि मग अशा ठिकाणी शोषणाला थारा राहणार नाही आणि अंधश्रद्धा आपोआपच कमी होईल. दु:खाला शरण न जाता स्त्रीने त्याला सामोरे जायला हवे. दु:ख पेलण्याची ताकद वाढविली तर खोटे आधार (अंधश्रद्धा) शोधण्याची तिला गरजच राहणार नाही. तसेच लोकांच्या अंधश्रद्धांवर थेट घाला घालण्यापेक्षा त्यांना वैज्ञानिक सत्य समजावून सांगणे आणि शास्त्रशुद्ध विवेचनातून त्यांनाच निर्णय घ्यायला प्रवृत्त करणे हा एक प्रभावी उपाय ठरू शकतो.

जी गोष्ट विज्ञानाच्या कसोटीवर खरी उतरत नाही अथवा जे प्रत्यक्षात नाही त्यावर विश्वास ठेवणे म्हणजे अंधश्रद्धा. श्रद्धा असावी पण ती मनाचे आणि बुद्धीचे डोळे उघडे ठेवूनच. श्रद्धा एखाद्या विशिष्ट मर्यादेपर्यंत असावी त्या मर्यादेपलीकडे जाऊन श्रद्धेला अंधश्रद्धेचे रूप देऊ नये. मनाच्या कणखरपणासाठी, सदाचारासाठी श्रद्धा आणि मनाच्या दुबळेपणावर पांघरूण घालण्यासाठी अंधश्रद्धा हा फरक समजलाच पाहिजे. श्रद्धा असणे म्हणजे देव मानणे असा अर्थ अनेकदा काढला जातो; पण तसा तो खरेच आहे का, याचा विचारच केला जात नाही. खरे तर, श्रद्धेची अनेक स्थाने आहेत. त्यातील देव हे एक असूच शकते पण केवळ ते एकच आहे असे मात्र निश्चितच नाही. कलावंताची त्याच्या कलेवर श्रद्धा असते, मुलाची आईवर असू शकते, कामगाराची कामावर, बायकोची नवऱ्यावर, शिष्याची गुरुवर तर रुग्णाची जीवनदान देणाऱ्या एका डॉक्टरवरसुद्धा श्रद्धा असू शकते. त्याचप्रमाणे आपल्या विचारांवर, तत्त्वांवर, मूल्यांवर आणि जीवनावर श्रद्धा असणारीही अनेक माणसे आपल्या आजूबाजूला असतात. फक्त त्यांना ओळखण्याची नजर तुमच्याकडे असावी लागते. वयानुसार, अनुभवानुसार श्रद्धास्थाने बदलू शकतात. प्रत्येक श्रद्धा ही अंधश्रद्धाच असते असे नाही. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातली सीमारेषा आपली विवेकबुद्धी ठरवते. त्यामुळेच आत्मिक बळ देते, सद्सद्विवेकबुद्धी वृद्धिंगत करते ती

श्रद्धा आणि नष्ट करते ती अंधश्रद्धा. शिक्षणामुळे माणसाचे डोळे उघडतात. श्रद्धेमुळे मिटतात आणि अंधश्रद्धेमुळे मिटलेलेच राहतात. याचा अर्थ, संकटकाळात, कठीण प्रसंगात एखादी गोष्ट केल्याने बळ मिळते, आधार मिळतो, मार्गदर्शन मिळते तेव्हा ती श्रद्धा. त्या आधारामुळे जेव्हा तो संकटातून बाहेर पडतो आणि कुठेतरी नतमस्तक होतो. शांतता अनुभवतो त्यावेळीही ती श्रद्धा. परंतू संकटातून बाहेर पडण्यासाठी जेव्हा दुसऱ्याचा वापर केला जातो, त्याला इजा केली जाते तेव्हा ती अंधश्रद्धा. श्रद्धेमध्ये नम्रता आहे, लीनता आहे तर अंधश्रद्धेमध्ये क्रूरता हे लक्षात घेतले तर, पुरुष असो वा स्त्री अंधश्रद्धेला बळी पडणारच नाहीत.

## अंधश्रद्धा निर्मूलन कायदा काय म्हणतो...?

- भूत उतरविण्याच्या बहाण्याने एखाद्या व्यक्तीला, दोराने किंवा साखळीने बांधून ठेवून मारहाण करणे, काठीने किंवा चाबकाने मारणे, पादत्राणे भिजवलेले पाणी प्यायला लावणे, मिरचीची धुरी देणे, छताला टांगणे, दोराने किंवा केसांनी बांधणे, त्या व्यक्तीचे केस उपटणे, व्यक्तीच्या शरीरावर किंवा अवयवांवर तापलेल्या वस्तूचे चटके देऊन इजा पोहोचविणे, उघड्यावर लैंगिक कृत्य करण्याची जबरदस्ती करणे, व्यक्तीवर अघोरी कृत्य करणे, तोंडात जबरदस्तीने मूत्र किंवा विष्ठा घालणे किंवा यांसारख्या कोणत्याही कृती करणे.
- एखाद्या व्यक्तीने तथाकथित चमत्कार करून दाखवणे आणि त्यापासून आर्थिक प्राप्ती करणे, तसेच अशा तथाकथित चमत्कारांचा प्रचार व प्रसार करून लोकांना फसवणे, ठकवणे अथवा त्यांच्यावर दहशत बसविणे.
- अतिंद्रिय शक्तीची कृपा मिळविण्यासाठी, जिवाला धोका निर्माण होतो किंवा शरीराला जीवघेण्या जखमा होतात अशा अनिष्ट व अघोरी प्रथांचा अवलंब करणे; आणि अशा प्रथांचा अवलंब करण्यास इतरांना प्रवृत्त करणे, उत्तेजन देणे किंवा सक्ती करणे.
- मौल्यवान वस्तू, गुप्त धन, जलस्रोत यांचा शोध घेण्याच्या बहाण्याने वा तत्सम कारणाने करणी वा भानामती या नावाने कोणतेही अमानुष कृत्य करणे आणि जारणमारण अथवा देवदेवस्की यांच्या नावाखाली नरबळी देणे, किंवा देण्याचा प्रयत्न करणे; किंवा अशी अमानुष कृत्ये करण्याचा सल्ला देणे, त्याकरिता प्रवृत्त करणे, अथवा प्रोत्साहन देणे.
- आपल्या अंगात अतिंद्रिय शक्ती असल्याचे भासवून अथवा अतिंद्रिय शक्ती संचारली असल्याचा आभास निर्माण करून इतरांच्या मनात भीती निर्माण करणे वा त्या व्यक्तीचे सांगणे न ऐकल्यास वाईट परिणाम होतील अशी इतरांना धमकी देणे.
- एखादी विशिष्ट व्यक्ती करणी करते, काळी विद्या करते, भूत लावते, मंत्रतंत्राने जनावरांचे दूध आटवते, असे सांगून त्या व्यक्तीबाबत संशय निर्माण करणे, त्याचप्रमाणे एखादी व्यक्ती अपशकुनी आहे रोगराई पसरल्यास कारणीभूत आहे, इत्यादी सांगून वा भासवून संबंधित व्यक्तीचे जगणे मुश्किल करणे, त्रासदायक करणे वा कठीण करणे; कुठलीही व्यक्ती सैतान असल्याचे किंवा ती सैतानाचा अवतार असल्याचे जाहीर करणे.
- जारणमारण, करणी किंवा चेटूक अथवा यांसारखे प्रकार केले आहेत या सबबीखाली एखाद्या व्यक्तीला मारहाण करणे, तिची नग्नावस्थेत धिंड काढणे, किंवा तिच्या रोजच्या व्यवहारांवर बंदी घालणे.
- मंत्राच्या साहाय्याने भूत पिशाच्चांना आवाहन करून किंवा भूत पिशाच्चांना आवाहन करीन अशी धमकी देऊन एकूणच लोकांच्या मनात घबराट निर्माण करणे, मंत्रतंत्र अथवा तत्सम गोष्टी करून एखाद्या व्यक्तीस विषबाधेतून मुक्त करतो आहे असे भासवणे,
- शारीरिक इजा होण्यास भुताचा किंवा अमानवी शक्तीचा कोप असल्याचा समज करून देणे, लोकांना वैद्यकीय उपचार घेण्यापासून रोखून, त्याऐवजी त्यांना अघोरी कृत्ये वा उपाय करण्यास प्रवृत्त करणे, अथवा मंत्रतंत्र (चेटूक), जादूटोणा अथवा असेच तथाकथित उपाय करण्याचा आभास निर्माण करून लोकांना मृत्यूची भीती घालणे, वेदना देणे किंवा आर्थिक वा मानसिक हानी पोहोचविणे.
- कुत्रा, साप, विंचू आदि चावल्यास व्यक्तीला वैद्यकीय उपचार घेण्यापासून रोखून किंवा प्रतिबंध करून, त्याऐवजी मंत्रतंत्र, गंडेदोरे, यासारखे इतर उपचार करणे.
- बोटाने शस्त्रक्रिया करून दाखवतो असा दावा करणे किंवा गर्भवती स्त्रीच्या गर्भाचे लिंगबदल करून दाखवतो असा दावा करणे.

  (क) स्वतःत विशेष शक्ती असल्याचे अथवा कुणाचातरी अवतार असल्याचे वा स्वतःत पवित्र आत्मा असल्याचे भासवून किंवा त्याच्या नादी लागलेल्या व्यक्तीस पूर्वजन्मी तू माझी पत्नी, पती वा प्रेयसी, प्रियकर होतास असे सांगून, अशा व्यक्तीशी लैंगिक संबंध ठेवणे;

  (ख) मूल न होणाऱ्या स्त्रीला अतिंद्रिय शक्तीद्वारा मूल होण्याचे आश्वासन देऊन तिच्याशी लैंगिक संबंध ठेवणे.
- एखाद्या मंद बुद्धीच्या व्यक्तीमध्ये अतिंद्रिय शक्ती आहे असे इतरांना भासवून त्या व्यक्तीचा धंदा व व्यवसाय यासाठी वापर करणे.

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# ‘सुहिता’

## तुमच्यासाठी आयोगाचा
## मदतीचा हात

संकटात आहात?

माहिती हवीय?

Helpline

# ७४७७७२२४२४

## घाबरू नका..
## सहन करू नका...

## संपर्क साधा ‘सुहिता’वर

### महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची हेल्पलाइन

आयोगाशी संपर्क


mscwmahilaayog@gmail.com

www.mscw.org.in

Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)

Maharashtra women commission (@mscw_bandra)

Tejaswini App




# भारतीय महिलांची दमदार कामगिरी

अमित मधुकर डोंगरे
amitdongre10@gmail.com

**आशियाई स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी यंदा अनपेक्षित यश मिळवले. भारताला मिळालेल्या एकूण पदकांपैकी सत्तर टक्के पदके महिला खेळाडूंनी मिळवली आहेत. आता या खेळाडूंबरोबरच जागतिक स्पर्धेतून पात्र ठरलेल्या खेळाडूंनाही टोकियो-२०२० ऑलिंपिकचे स्वप्न पडू लागले आहे. अंजुम मोदगिल आणि अपूर्वी चंडेला या दोघींनी जागतिक नेमबाजी स्पर्धेत सरस कामगिरी करत ऑलिंपीक पात्रता मिळवली.**

भारताच्या अंजूम मोदगिल आणि अपूर्वी चंडेला यांनी जागतिक अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेमध्ये १० मीटर एअर रायफल प्रकारामधील कामगिरीद्वारे २०२० च्या ऑलिंपिकसाठी कोटा मिळवला. महिला गटात अंजुमने १० मीटर एअर रायफलमध्ये रौप्यपदकाची कमाई केली, तर अपूर्वी चौथ्या स्थानावर राहिली. आगामी टोकियो ऑलिंपिकसाठी कोटा मिळवणाऱ्या अंजूम आणि अपूर्वी या भारताच्या पहिल्या दोन नेमबाज ठरल्या आहेत. अंजूमच्या रुपाने भारताने या स्पर्धेत वरिष्ठ गटात पदकांचे खाते उघडले. भारताला ज्युनियर गटातही दोन पदके मिळाली होती.

अंतिम आठ महिलांच्या अंतिम फेरीत २४ वर्षीय अंजूमने या प्रकारात २४८.४ गुण मिळवून रौप्यपदकावर नाव कोरले. कोयियाची हाना इम हिने २५१.१ गुणांसह सुवर्णपदक मिळवले, तर कोरियाच्याच युनही जंगने(२२८.०) ब्राँझपदकाची कमाई केली. चौथ्या स्थानावरील अपूर्वीने २०७ गुण मिळवले. २४ शॉट्सच्या अंतिम फेरीत अपूर्वीने पहिल्या पाच शॉट्समध्ये ५२.२ गुण मिळवले. यावेळी अंजूमनेही कामगिरीत सातत्य राखले होते. यानंतर हाना, अंजूम, जुंग, अपूर्वी, लिन यिंग-शिन यांच्यात चांगलीच चुरस बघायला मिळाली. स्पर्धेतील १८ व्या शॉटनंतर अपूर्वी तिसऱ्या स्थानावर होती, तर जुंग चौथ्या स्थानावर होती. १९ व्या शॉटला अपूर्वीला केवळ ९.६ गुणच घेता आले आणि नंतर ती पदकाच्या शर्यतीतून बाहेर पडली. अंजूमलाही १९ व्या आणि २० व्या शॉट्सला अनुक्रमे ९.८ आणि ९.७ गुणच मिळवता आले. यानंतर २३ व्या शॉट्सलाही तिला केवळ ९.९ गुणच घेता आले आणि सुवर्णपदकापासून ती मागे राहिली. तत्पूर्वी, पात्रता फेरीत अंजूम चौथ्या, तर अपूर्वी सहाव्या स्थानावर होती. दरम्यान, १० मी. एअर

रायफल पुरुष गटात भारताच्या दीपक कुमारने अंतिम फेरीत प्रवेश केला होता. मात्र, अंतिम फेरीत त्याला सहाव्या स्थानावर समाधान मानावे लागले.



## अंतिम निर्णय संघटनेचा

या प्रकारात एका देशाला दोन ऑलिंपिक कोटा असतात. आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा संघटनेची (आयएसएसएफ) ही टोकियो ऑलिपिंकमध्ये प्रवेश मिळवण्यासाटीची पहिली स्पर्धा आहे. यातून १५ प्रकारांतून ६० नेमबाजांना ऑलिंपिक कोटा मिळेल. भारताच्या अंजूम आणि अपूर्वी यांनी कोटा प्राप्त केला असला, तरी नियमानुसार अंतिम निर्णय भारतीय राष्ट्रीय रायफल संघटना घेईल. निवड चाचणी आणि विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील नेमबाजांची कामगिरी लक्षात घेऊन ऑलिंपिकमध्ये कोणाला पाठवायचे याचा निर्णय संघटना घेईल. चंडीगडच्या अंजूमने गोल्ड कोस्ट राष्ट्रकुल स्पर्धेत ५० मीटर रायफल ३ पोझिशनमध्ये रौप्यपदक मिळवले असून, याच वर्षीच्या वर्ल्ड कपमध्ये तिने रौप्यपदक पटकावले आहे. गेल्या वर्षीय ब्रिस्बेन येथे झालेल्या राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धेतही तिने रौप्यपदकाची कमाई केली होती.

नुकत्याच पार पडलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला १५ सुवर्ण, २४ रौप्य आणि ३० ब्रॉंझ पदके जिंकली. इंडोनेशियातील जकार्तामध्ये झालेल्या या स्पर्धेत स्वप्ना बर्मन, राही सरनोबत, द्युती चंद, हिमा दास, दीपा कर्माकर, सीमा पुनिया, दीपिका कुमारी या खेळाडूंनी ठसा उमटवला. आता येत्या ऑलिंपिक स्पर्धेत या खेळाडूंबरोबरच अंजूम आणि अपूर्वी यांच्याकडूनही पदकाच्या आशा निर्माण झाल्या आहेत.

घरची बेताची परिस्थिती, त्यात अचानक उद्भवलेल्या आजारांशी करावा लागलेला सामना अशा अनेक अडथळयांची शर्यत स्वप्ना बर्मन घरीही पार करतच होती. म्हणूनच की काय एशियाडमधल्या अडथळा शर्यतीसह अन्य क्रीडा प्रकारांचे आव्हान तिने लीलया पेलले आणि आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक कमावले. हेप्टॅथलॉन प्रकारात स्वप्नाने भारताला पहिलेवहिले सुवर्णपदक मिळवून दिले. रिक्षाचालक असलेल्या स्वप्नाच्या वडिलांना तिच्या यशाने आभाळ ठेंगणे झाले आहे. आईच्या तोंडातून तर शब्दही बाहेर पडत नव्हते. तिने थेट घरातील देवीच्या मंदिरात माथा टेकला आणि अश्रूंना वाट मोकळी करून दिली. स्वप्नाचे यश खरेच तिच्यासाठी सोपे नव्हते. स्वप्नाच्या दोन्हा पायांना ६-६ बोटे आहेत. त्यामुळे आपल्या पयांसाठी योग्य बुटांसाठी तिला नेहमीच संघर्ष करावा लागला. पुढच्या पावलाच्या अतिरिक्त रुंदीमुळे तिला लँडिंगही कठीण व्हायचे आणि बूट सतत फाटायचे. मात्र, याची तक्रार न करता तिने सुवर्णयश खेचून आणले.

आसाममधील एका छोटया गावात राहणारी हिमा, घरात पाच भावंडे, शाळेत असताना हिमाला फुटबॉल खेळारूला फार आवडे. मात्र तिच्या सोबतच्या मुलींना फुटबॉल खेळण्यात काहीही रस नव्हता. मग हिमा मुलांमध्ये खेळण्यासाठी जात होती. तिची खेळाप्रतीची निष्ठा पाहून शाळेतील शिक्षकांनी तिला ॲथलेटिक्सम ध्ये येण्याचा सल्ला दिला. कुठल्याही सुविधा नसतानाही ती भाताच्या शेतात धावण्याचा सराव करीत होती. तिच्यातील गुणवत्ता बघून तिला प्रशिक्षणासाठी गुवाहाटीला सरावासाठी जाण्यास सांगितले. सुरुवातीला वडिलांचा विरोध होता. मात्र, नंतर त्यांचाही तिला पाठिंबा मिळाला. इंडोनेशिया एशियाडमध्ये तीन पदके मिळवून तिने आपल्यातील गुणवत्ता सिद्ध केली.

अगदी हलाखीच्या परिस्थितीतून द्युती चंद ॲथलेटिक्समध्ये आली. आंतरराष्ट्रीय स्तरावर ती झळकतच होती, तेवढयात २०१४ मध्ये तिच्यावर आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स फेडरेशनने निलंबनाची कारवाई केली. पुरुष संप्रेरकांचे प्रमाणासंदर्भातील धोरणानुसार तिच्यावर ही कारवाई करण्यात आली होती. तिच्या शरीरात ही संप्रेरके अधिक प्रमाणात आढळली होती. तिने त्याविरोधात क्रीडा लवादाकडे दाद मागितली आणि तो खटला तिने जिंकला. दरम्यान, गोपीचंद यांच्या ॲकेडमीत राहून सराव केला. गोपीचंद यांनी तिला शक्य ती सारी मदत केली. आपल्या कामगिरीच्या जोरावर तिने एशियाडमध्ये भारताच्या खात्यात दोन पदके जमा केली.

## भारतीय कबड्डीत महाराष्ट्राची मोहोर

भारतीय पुरुष संघ कबड्डीच्या आठव्या सुवर्णपदकाच्या शर्यतीत अपयशी ठरला मात्र महिलांनी रौप्य पदकाला गवसणी घातली. महिलांच्या अंतिम लढतीत भारताची कर्णधार पायल चौधरी आणि महाराष्ट्राच्या दोन उदयोन्मुख खेळाडू सायली करपाळे आणि सोनाली शिगटे यांच्या अफलातून चढाईवर भारताने रौप्य पदक मिळवले. इराणच्या खेळाडूंच्या सरस खेळासमोर भारतीय महिलांना पराभवाचा सामना करावा लागला. खरे तर कबड्डीत इतकी नामुष्की आली नसती मात्र प्रो कबड्डी लीगमुळे परदेशी संघांनाही या खेळाची सर्वांगीण माहिती झाल्यामुळे ते देखील तुल्यबळ बनले आहेत हे मान्य करावेच लागेल.

जपानमध्ये होणारे २०२० ऑलिंपिक आता आपल्या खेळाडूंचे प्रमुख लक्ष्य आहे. तेथील वातावरणात आपले खेळाडू कसे खेळतात शिवाय परदेशी संघांच्या तोडीस तोड खेळ कसा करतात यावरच भारतीयांचे यशापयश अवलंबून आहे.



# राहीचा सुवर्णवेध!

कोल्हापूरची अव्वल नेमबाज राही सरनोबत हिने एशियाडमध्ये चमत्कार घडवला. या स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवणारी राही भारताची पहिलीच महिला नेमबाज ठरली. आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पदके मिळवलेल्या राहीने या सुवर्णपदकासह आगामी टोकिओ २०२० ऑलिंपिकसाठी आशा पल्लवित केल्या आहेत.

२००६ मध्ये तेजस्विनी सावंत हिने नेमबाजीत राष्ट्रीय पदक मिळवले होते त्यावेळी कोल्हापूरमध्ये तिची जंगी मिरवणूक काढण्यात आली होती त्यावेळी राही या मिरवणुकीत सर्वप्रथम तेजस्विनीला भेटली. या भेटीमुळे राही इतकी प्रभावित झाली की आपणही तेजस्विनीप्रमाणेच नेमबाजी करावी आणि देशाचे प्रतिनिधित्व करावे अशी स्वप्नही पाहू लागली त्यावेळी ती केवळ दहावीत होती. वडील जीवनराव आणि आई प्रभा यांना राहीने विज्ञान शाखेची पदवी घ्यावी असे वाटत होते, मात्र पदवीपेक्षा आंतरराष्ट्रीय पदके मिळवणे हेच राहीचे ध्येय होते.

२००८ पासून अजित पाटील यांच्याकडे संभाजी राजे क्रीडा संकुलात नेमबाजीचा सराव सुरू केला त्यानंतर आद्ययावत सरावासाठी ती पुण्यात लक्ष्य या संस्थेत दाखल झाली. त्याच वर्षी पुण्यात झालेल्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेत तिने कारकिर्दीतील पहिलेवहिले पदक जिंकले. त्यानंतर तिने मागे वळून पाहिलेच नाही आजमितीला जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मिळून शेकडो पदके तिने मिळविलीत आहेत. २०१७ला दुखापतीमुळे तिला ऑलिंपिक पात्रता स्पर्धेत खेळता आले नाही परिणामी तिची ऑलिंपिक खेळण्याची संधी हुकली. आता एशियाडमधील मिळविलेल्या पदकामुळे २०२० च्या ऑलिंपिकसाठी ती पूर्ण सज्ज आहे.

# आशियाई क्रीडा स्पर्धेत उंचावली भारताची शान



**विनेश फोगाट**
५० किलो कुस्ती
**सुवर्ण पदक**



**सायना नेहवाल**
बॅडमिंटन सिंगल
**ब्राँझ पदक**



**राही सरनोबत**
२५ मीटर पिस्तूल शूटिंग
**सुवर्ण पदक**



**पी. व्ही. सिंधू**
बॅडमिंटन सिंगल
**रौप्य पदक**



**हिमा दास**
४०० मीटर धावणे
**रौप्य पदक**



**अपूर्वी चंदेला**
१० मीटर एअर रायफल
**ब्राँझ पदक**



**हीना सिद्धू**
१० मीटर पिस्तूल शूटिंग
**ब्राँझ पदक**



**दीपिका पल्लीकल**
स्क्वाश
**ब्राँझ पदक**



**दूती चंद**
१० मीटर धावणे
**रौप्य पदक**



**अंकिता रैना**
टेनिस महिला
**ब्राँझ पदक**



**रोशिबीना देवी**
60 kg वुशू
**ब्राँझ पदक**



**दिव्या काकरण**
68 kg कुस्ती
**ब्राँझ पदक**




# हिमा दासने रचला इतिहास




**अमित मधुकर डोंगरे**
amitdongre10@gmail.com

फिनलंड येथे झालेल्या २० वर्षांखालील जागतिक मैदानी स्पर्धेत भारताच्या हिमा दास या अठरा वर्षीय खेळाडूने सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला. जागतिक स्पर्धेत अशी कामगिरी करणारी हिमा भारताची पहिलीच महिला धावपटू ठरली.

चारशे मीटर शर्यतीत हिमाने ५१.४६ सेकंद अशी वेळ नोंदवत सुवर्णपदकाला गवसणी घातली. केवळ दोन वर्षांपूर्वी तिने धावपटू म्हणून कारकिर्दीला सुरुवात केली होती आणि आज सर्व भारतात तिचे नाव घराघरांत पोचले आहे. खरेतर आसाममध्ये एका खेडेगावात शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या हिमाला फुटबॉलमध्ये कारकीर्द घडवायची होती, पण कोणाच्या नशिबात काय परिवर्तन घडते हे कोणीच सांगू शकत नाही. खेडेगावात फुटबॉलसाठी आवश्यक मैदान, अकादमी या सुविधाच नसल्याने तिने मग मैदानी स्पर्धेत कारकीर्द घडावी यासाठी तयारी सुरू केली.

भाताच्या खचरात हिमा फुटबॉल खेळत असताना तिच्या शाळेतील एका शिक्षकाने पाहिले मात्र त्यांनी तिला फुटबॉलऐवजी मैदानी स्पर्धेत भाग घे असा सल्ला दिला व नीपोन दास यांची गाठ घालून दिली. मैदानी सपर्धेतील एकेकाळचे राष्ट्रीय खेळाडू आणि प्रशिक्षक नीपोन दास यांनी हिमा या हिऱ्याला पैलू पाडले. त्यांनी तिला गुवाहाटीतील त्यांच्या अकादमीत बोलावले पण सुरुवातीला तिच्या पालकांनी याला विरोध केला. त्यांच्या गावापासून गुवाहाटी जवळपास दीडशे किलोमीटर लांब आहे त्यामुळे ही एकटी मुलगी कशी तिकडे पाठवायची असा त्यांचा विचार होता मात्र नीपोन दास यांनी खात्री दिल्यानंतर हिमाचे पालक तयार झाले व हिमा आपल्या स्वप्नांचा पाठलाग करण्यासाठी सज्ज झाली. तिचा

**फिनलंड येथे झालेल्या २० वर्षांखालील जागतिक मैदानी स्पर्धेत भारताच्या हिमा दास या अठरा वर्षीय खेळाडूने सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला. जागतिक स्पर्धेत अशी कामगिरी करणारी हिमा भारताची पहिलीच महिला धावपटू ठरली. हिमाच्या रूपाने आणखी एक पी. टी. उषा देशाला मिळत आहे आणि आतापासूनच जर तिला पाठिंबा, प्रोत्साहन आणि आर्थिक स्थैर्य मिळाले तर अशक्य ते शक्य करून दाखविण्याची तिची निश्चितच क्षमता आहे.**

धावण्याचा वेग पाहून सहकारी खेळाडूच नव्हे तर नीपोन दासदेखील थक्क झाले. भारताला नवी पी. टी. उषा मिळाली आहे असे ते आज अभिमानाने सांगतात.

हिमा ही आसाममधील नागाव जिल्हयातील कांधुलीकारी या गावात राहते. तिचे वडील रणजित दास शेतकरी आहेत तर आई जुनाली शेतीच्याच कामात त्यांना मदत करते. हिमाला तीन भावंडे आहेत. घरात एकूण सहा जण आहेत. शेतीतील अत्यंत तुटपुंज्या उत्पन्नावर त्यांची गुजराण चालते.

हिमाला आपल्या घरच्या परिस्थितीची चांगलीच कल्पना असून, संपूर्ण कुटुंबाला या परिस्थितीतून बाहेर काढून एक सुखी आयुष्य देण्याचा प्रयत्न ती करीत आहे. आता या जागतिक मैदानी स्पर्धेतील सुवर्णपदकामुळे तिला आर्थिक संकटातून बाहेर पडायला मदत होणार आहे. आशियाई व ऑलिम्पिक या कशाचाही आता विचार न करता प्रत्येक स्पर्धेत सहभागी व्हायचे आहे आणि देशासाठी सर्वोत्तम कामगिरी करायची आहे हा एकच निर्धार तिने केला आहे.

हिमाने मार्च महिन्यात पतियाळा येथे झालेल्या फेडरेशन चषक स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले व त्याचबरोबर राष्ट्रकुल स्पर्धेची पात्रतादेखील मिळवली. गोल्ड कोस्ट येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत मात्र तिला अपयशाचा सामना करावा लागला. चारशे मीटर शर्यतीत ती सहाव्या स्थानवर राहिली तर चार बाय चारशे मीटर शर्यतीत तिला सातव्या स्थानावर समाधान मानावे लागले. त्यानंतर मे महिन्यात राजधानीत झालेल्या इंडियन ग्रां. प्री. स्पर्धेतही शंभर मीटर शर्यतीत ती पाचव्या स्थानावर होती.

हे सलग येत असलेले अपयश तिला सलत होते. तिने पुन्हा अकादमीत जोरदार सराव सुरू केला. शारीरिक तंदुरुस्तीवर भर दिला. श्वास किंवा दम रोखून धरत जास्तीत जास्त अंतर पार करण्याचाही तिने सराव कला आणि ती गुवाहाटीतच झालेल्या आंतरराज्य स्पर्धेत उतरली आणि अपयश मागे टाकत चमत्कार घडवला. या स्पर्धेत चारशे मीटर शर्यतीत ५१.१३ अशी सर्वोत्तम वेळ नोंदवत तिने सुवर्णपदक पटकावले व हरवलेला फॉर्म आणि आत्मविश्वास परत मिळवला.

पी. टी. उषा. शायनी विल्यम्स्, सीमा पुनिया, ललिता बाबर, कविता राऊत यांच्यानंतर आता जागतिक मैदानी स्पर्धेच्या क्षितिजावर हिमा दास हिचा उदय झाला आहे. सध्या ती केवळ अठरा वर्षांची आहे, खूप मोठी कारकीर्द तिच्यासमोर आहे. तिचे वडील रणजित दास म्हणतात त्याप्रमाणे ''हिमा खूप हट्टी आहे. एकदा जर तिने एखादी गोष्ट करायची ठरवली तर ती गोष्ट पूर्ण केल्याशिवाय तिला चैन पडत नाही.'' खऱ्या आणि कसोटीला




उतरणाऱ्या प्रत्येक खेळाडूला हाच हट्ट एका सामन्य खेळाडूपासून असामान्य खेळाडू बनवत असतो.

पायोली एक्सप्रेस पी. टी. उषा हीच तिची आदर्श आहे त्यामुळे तिच्यासारखेच किंबहुना तिच्यापक्षाही जास्त यश हिमा मिळवेल, असा विश्वास वाटतो. मात्र हिमाला आता खरी गरज आहे सरकारी राजाश्रयाची. केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने टी. ओ. पी. (टार्गेट ऑलिम्पिक पोडियम) हा जो उपक्रम हाती घेतला आहे त्यात हिमाचा समावेश करून एक चांगला निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे तिला पन्नास हजार रुपये शिष्यवृत्तीदेखील मिळेल. सरकारी कोट्यातून तिला घर मिळावे ते देखील दिल्ली किंवा गुवाहाटीत जेणेकरून ती अकादमीत जास्तीत जास्त सराव करेल. प्रायोजकांनीही पुढे येऊन तिला मदतीचा हात दिला तर तिला जगभरात होणाऱ्या विविध मैदानी स्पर्धांमध्ये सहभागी होता येईल. यामुळे तिला आफ्रो-आशियाई आणि नंतर ऑलिम्पिक स्पर्धेची संधी मिळेल. हिमा दासच्या रूपाने आणखी एक पी. टी. उषा देशाला मिळत आहे आणि आतापासूनच जर तिला पाठिंबा, प्रोत्साहन आणि आर्थिक स्थैर्य मिळाले तर अशक्य ते शक्य करून दाखविण्याची तिची निश्चितच क्षमता आहे.

# भारतातील दुसऱ्या महिला डॉक्टर

# कोल्हापूरच्या कृष्णाबाई केळवकर



**ज्या काळात महिलांनी शिक्षण घेणेदेखील समाजाला मान्य नव्हते, त्याच काळात कोल्हापुरातील कृष्णाबाई केळवकर डॉक्टर बनल्या. राजर्षी शाहू महाराजांचा त्यांना पाठिंबा होता. दोन सप्टेंबरला त्यांचा स्मृतिदिन होता. त्या निमित्त.**

**डॉ. सई लळीत,** कोल्हापूर

saeelalit@gmail.com

कोल्हापूरच्या कृष्णाबाई केळवकर या भारतातील दुसऱ्या महिला कार्यरत डॉक्टर. आनंदीबाई जोशी या भारतातील पहिल्या महिला डॉक्टर. त्यांची कोल्हापूरला राजर्षी शाहू महाराजांनी नेमणूकही केली होती, पण क्षयामुळे त्यांचे अकाली निधन झाले आणि त्याच जागी कृष्णाबाई केळवकरांची नेमणूक झाली.

कृष्णाजी आणि रखमाबाई केळवकरांची ही कन्या. हे शिक्षणप्रेमी दांपत्य बैलगाडीचा आठ दिवसांचा प्रवास करुन कोल्हापूरहून पुण्याला आले आणि १८८७ साली हुजूरपागेत त्यांचं शिक्षण सुरू झालं. त्या अत्यंत हुषार, निगर्वी आणि मेहनती होत्या. न्यायमूर्ती रानडे यांनी त्यांना व त्यांच्या दोन बहिणींना आपल्या वाड्यावरच ठेवून घेतले. रमाबाई रानडे यांनी त्यांच्यावर मायेची पाखर घातली.

मॅट्रिकची परीक्षा त्या उत्तम रीतीने पहिल्या क्रमांकाने पास झाल्या. पुढे फर्ग्युसनला कॉलेजचं शिक्षण घ्यायचं त्यांच्या मनात होतं पण सनातनी लोकांनी कडाडून विरोध केला. अशाने समाज बिघडेल असं त्यांच मत होतं. त्यावेळी स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते आणि खंदे समाज सुधारक प्रिं. गोपाळ गणेश आगरकर त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले. कृष्णाबाई केळवकर आणि गोदुबाई देशपांडे या फर्ग्युसनच्या पहिल्या महिला विद्यार्थिनी ठरल्या.

आज वाचून गंमत वाटते..पण त्यांना कॉलेजमधे वेगळा जिना वापरावा लागे. तसेच वर्गात मुलगे आणि मुलींमधे चिकाचा पडदा होता. जेव्हा त्यांच्या डॉक्टर वडिलांनी तीव्र नापसंती व्यक्त केली, तेव्हा तो पडदा हटवला गेला.

संस्कृत विषयाची त्यांना अत्यंत गोडी होती. त्यामुळे त्यांनी त्याचा सखोल अभ्यास सुरू केला. संस्कृतसाठीची गंगूताई भट शिष्यवृत्ती त्यांना मिळाली.



इंटरनंतर त्या कोल्हापूरला आल्या आणि पुढील शिक्षणासाठी त्यांनी राजाराम कॉलेजला प्रवेश घेतला.पण त्यांच्या आई-वडिलांची त्यांनी डॉक्टर व्हावं, अशी प्रबळ इच्छा होती.

हे कळल्यावर राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना आर्थिक सहाय्य केले आणि डॉक्टर झाल्यावर त्यांनी कोल्हापूरला काम करावे, अशी अट घातली. कृष्णाबाई मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमधे बुद्धिमत्तेने चमकू लागल्या. तिथे गेल्यावर दुसऱ्याच वर्षी प्लेगने मुंबईत धुमाकूळ घातला. नेमके त्याच दरम्याने न्यायमूर्ती रानडे मलबार हिलवर राहायला आले होते. निर्मनुष्य चाळीत कृष्णाबाई एकट्याच राहात होत्या. त्यांनी ही सर्व हकीकत पत्राने कळवताच रमाबाई लगेच गाडी घेऊन त्यांना घ्यायला आल्या .

ज्यांनी या देशाच्या जडणघडणीचे कार्य केले, त्या न्यायमूर्ती रानडे, नामदार गोखले, प्रिन्सीपॉल आगरकर, महर्षी कर्वे यासारख्या दिग्गज व्यक्तींचे पालकत्व कृष्णाबाईना लाभले. पुरोगामी विचारानी आधीच धीट, हुशार आणि बुद्धिमान असणाऱ्या कृष्णाबाईचे व्यक्तिमत्त्व आत्मतेजाने झळाळून उठले.

पुढे १९०१ साली मुंबई विद्यापीठाची एल.एम. अँड एस.ची परीक्षा त्या पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाल्या. तिथे प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्याला मिळणारे चार्लस मुरहेड हे पदकही त्यांनी प्राप्त केले. कोल्हापूरला येताच दरबाराशी झालेल्या करारानुसार अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटल (सध्याचे सी.पी.आर ) येथे त्यांनी जोमाने काम सुरू केले.

तिथे आल्यावर त्यांच्या लक्षात आले की नर्स स्टाफ हा कमी शिकलेला, कमी नीतीचा आहे. फसवणूक करण्याचे प्रमाण जास्त आहे. डॉक्टर खासगी प्रॅक्टिसकडे लक्ष देतात. (तेव्हाही हीच परिस्थिती होती.)

सुरुवातीला ही बाई म्हणून डॉक्टर झाली...असा थोडा कमीपणाचा सूर सुरवातीला सगळ्यांचा होता. अपमान सहन करावा लागला. पण थोड्याच काळात त्यांनी तिथे जम बसवला. चांगल्या प्रशिक्षित नर्स मिळण्यासाठी १९१७मध्ये नर्सिंग कोर्स सुरू केला आणि उत्तेजनासाठी सहा स्कॉलरशिप सुरू केल्या.

शाहू महाराजांकडे हट्ट करुन त्यांनी महिलांसाठी खास वेगळा विभाग सुरू केला. त्यांनीही तो आनंदाने सुरु केला. गोरगरीब स्त्रियांसाठी हॉस्पिटल खूप आधाराचे ठरले. त्यांची बाळंतपणे सुखाने होवू लागली. सगळीकडे त्यांची ख्याती पसरली. जैन समाजाकडून त्यांना व्याख्यानासाठी निमंत्रित  करण्यात आले .त्या लांबलांबवर व्याख्यानासाठी जावू लागल्या.

पण एवढ्याने त्या संतुष्ट नव्हत्या. परदेशात जावून ऋ.ठ.उ.ड. व्हायचे त्यांच्या मनात होते. त्यादृष्टीने त्यांनी पत्रव्यवहार सुरू केला. त्यांच्या प्रयत्नांना फळ येवून त्याना हिंदी मुलींसाठी असलेली स्कॉलरशिप मिळाली. त्या काळात बोटीने दोन महिने एकट्याने प्रवास करुन त्या लंडनला पोचल्या खऱ्या, परंतु पत्ता शोधत बसल्यामुळे फक्त दहा मिनिटे उशीर झाला आणि प्रवेश नाकारला गेला.

तरीपण नाराज न होता आयर्लंडला जावून मिडवायफरी कोर्स करून त्या परत आल्या. परत येताच पुन्हा काम सुरू झालं. त्यांच्या अचूक निदानाने खूप जणं रोगमुक्त झाले. शाहू महाराजांचा भक्कम पाठिंबा त्यांना होता. त्यामुळे हॉस्पिटलमधे बरेच खटके उडाले तरी त्यांनी काम सुरूच ठेवलं.

महाराजांच्या निधनानंतर मात्र सरकारी सेवेचा राजीनामा देऊन त्यांनी खासगी प्रॅक्टिस सुरू केली. काही काळाने प्रॅक्टिस बंद करून त्यांनी अध्यात्माच्या मार्गावर वाटचाल सुरू केली. खूप वाचन मनन चिंतन केलं. गुरुदेव रानडे यांनी भेटीत त्यांना वाकून नमस्कार केला. यावरून त्यांचा या क्षेत्रातील अधिकार दिसून येतो.

अशा या अत्यंत सुसंस्कृत आणि रुग्णांच्या कैवारी डॉ. कृष्णाबाई केळवकरांचे २ सप्टेंबर १९६१ रोजी निधन झाले. त्यांनी सुरू केलेल्या जागेत आजही 'केळवकर मेडिकल सेंटर' दिमाखात उभे आहे आणि स्व. कृष्णाबाईंच्या स्मृती तेवत ठेवीत आहे. डॉ. प्रल्हाद केळवकर हे त्याची धुरा सांभाळत आहेत.





# महिलां भेदिले सत्तामंडळा...

**राजकारणाच्या पंचायतीत– पती, परिवार, विरोधक, अधिकारी व पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधतांना त्यांचे वादात रूपांतर होऊ नये, तो सुसंवाद व्हावा असा कारभारणीं नेहमी प्रयत्न करतात. परंतु, असभ्यता ओलांडली गेल्यास; त्या साम–दाम–दंड भेद याहून वेगळ्या रणनीतीही शोधतात हे खरं! या महिलांनी सत्ता मंडळांना भेदायला सुरुवात नक्की केली आहे!**

**भीम रासकर**

महिला राजसत्ता आंदोलनाने गतवर्षी निवडक कारभारणींसाठी लेखन कार्यशाळा घेतल्या. 'सत्ता चक्रव्यूह' भेदताना आलेल्या त्यांच्या अस्सल अनुभवांचा हा अध्ययन सारांश! महिला आरक्षणाच्या पंचविशीनंतर पतीराजांच्या मुठीतून म्हणजेच बाह्यसत्तेतून 'प्रजासत्ता व लोकशाही' मुक्त करण्यात कारभारणी कशा हळूहळू यशस्वी होत आहेत, ते समजून घेऊ या.

आरक्षणानं आम्ही सत्तेत आलो हे खरं, परंतु आमची द्रौपदी होत चाललीय. पक्ष, पुढारी, ग्रामसेवक, गावनेता व खरा घरचा धनी हे सगळेच आमच्यावर सत्ता गाजवतात, त्यांनी आपली व्यथा मांडली. कधी तरी एखादा आशेचा किरण दिसतो.

राजकारणातील कारभारणींचे पतीराज जर समजून घेणारे असतील तर त्या महिलेला पुढे प्रगती करण्यासाठी त्यांची सहज मदत होते, तसेच त्यामुळे सामाजिक व राजकीय विकासातील तिचे योगदानही वाढते. काही महिलांसाठी ही आदर्श परिस्थिती अस्तित्वात असली तरी बहुतांशी महिलांच्या संघर्षाची सुरुवात ही त्यांच्या परिवारसत्तेपासून होते. ज्यात भावनिक व शारीरिक अन्यायाबरोबरच राजकारणातील अस्वीकाराची सुरुवात होते. पतीराज हे कारभारणींच्या हालचालींवर सतत बंधने घालतात व तिच्या वतीने निर्णय घेतात. आर्थिक व्यवहारातही अविश्वास दाखविला जातो. शिवाय फोनमधील तपासणीत पंचायत सहकाऱ्यांचे फोन नंबर पाहून कारभारणींच्या चारित्र्यावर प्रश्न उपस्थित केला जातो. महिलांना ग्रामपंचायतीमधील बैठकांना उपस्थित राहण्यासाठी आताही परवानगी काढावी लागते. काही महिलांना निर्णय घेण्याचा आजही अधिकार नाही आणि एखादा निर्णय घ्यायचाच असेल तर तो निर्णय पतीशी सल्ला मसलत करूनच घ्यावा लागतो. एखाद्या महिलेला जर काही कामानिमित्ताने घराबाहेर जायचे असल्यास घरातील सर्व कामे करून जाणे बंधनकारक असते. राजकारणातील महिलांच्या सहभागाचा स्वीकार बहुदा पतीराजांकडून केला जात नाही, उलट



राजकारण हे वेळखाऊ काम असल्याचं वेळोवेळी त्यांना सांगण्यात येतं, हे असं असूनही महिलांनी राजकारणात आपला वेगळा ठसा नक्की उमटविला आहे!

आपल्या पतीशी पंचायतीत वागतांना त्यांनी वेगवेगळ्या डावपेचांचा अवलंब केला उदा. घरातील व शेतीची सर्व कामे करणे, कुटुंबातील सदस्यांना त्यांच्या गरजा व मागण्या पूर्ण करण्यासाठी स्वावलंबी बनविणे, पतीसोबतचे सार्वजनिक स्थळी नम्र बोलणे, राजकीय काम हे वेळखाऊ नाही, हे त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न करणे इत्यादी! पतीच्या किंवा जोडीदाराच्या दृष्टिकोनात बदल व्हावा यासाठी महिलांनी त्यांची समज वाढविण्यासाठी त्यांच्यासोबत लोकशाही मूल्य आणि समानता या विषयावरील चर्चा वाढविली. महिलांना प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष अनुभवाच्या माध्यमातून सामाजिक परिस्थिती समजते आणि पतीकडून पाठींबा मिळविण्यासाठी सर्व पतींची, महिला आणि मानवी हक्कासंदर्भातील जाणीव वाढविणे गरजेचे असते. काही वेळा पतीसोबत असणाऱ्या काही मतभेदांसाठी त्याला विरोध करण्याने काही साध्य होत नाही. त्यामुळे आपल्या जोडीदारासोबतचे काही मतभेद स्वीकारणे आणि वेळ आलीच तर त्यांच्या पाठींब्याशिवाय पुढे जाणे योग्य ठरते. काही महिलांनी पतीकडून पाठिंबा मिळविण्यासाठी प्रसारमाध्यमातील मुलाखतींमधून होणाऱ्या प्रसिद्धीचा चांगला वापर केला. महिलांना राजकारणामधून नाऊमेद करण्यासाठी त्यांच्या चारित्र्यावर प्रश्न निम र्ाण करण्याचे प्रयत्न केले गेले आहेत. त्यांचा विरोध मोडण्यासाठी या पतींना विविध कार्यक्रम व प्रशिक्षणात सहभागी करून घेणे तसेच महिला राजसत्ता आंदोलनाच्या कामाची व कार्यकर्त्यांची ओळख करून देणे अशा स्वरूपाचे प्रयत्नही केले जातात. हा ज्योतिबा संवाद खूप उपयोगी ठरतो.

घरगुती हिंसाचार हा महिलांच्या आयुष्याचा अविभाज्य घटक आहे. अशाच एका घटनेमध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींच्या एक सदस्येवर तिच्या नवऱ्याने शारीरिक अत्याचार केले. त्याच गावातील महिलांच्या गटाने अत्याचारी व हिंसक नवऱ्याला सामूहिकरीत्या जाब विचारला. महिला प्रतिनिधीच्या कुटुंबात असा काही संघर्ष उद्भवला तर तो सोडविण्याचा प्रयत्न केला जातो, ज्यातून त्या कुटुंबाचा हळूहळू पाठिंबा त्यांना मिळतो व इतर निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींनाही काम करण्याचे स्वातंत्र्य मिळतं. काही महिला प्रतिनिधींना काम करण्याचं स्वातंत्र्य मिळाले की मग, मलाही काम करण्याची मुभा का मिळू नये असा प्रश्न विचारून नवऱ्याची समजूतही काढली जाते. महिला राजकीय कामांमध्ये आपल्या पतीची मदत मागतात आणि जर पती पाठिंबा देणार नसेल तर त्याला समजविण्याचा प्रयत्न केला जातो. काही वेळा काम पूर्ण करण्यासाठी महिलांना आपल्या पतीशी खोटे बोलावे लागते. महिलांनी आपल्या पतीसोबत जुळवून घेण्याचे बरेच प्रयत्न केले मात्र प्रत्येक वेळी त्यात त्यांना यश आलेच असे नाही. अशावेळी संघटनेतील अनुभवी तज्ञांची त्या मदत घेतात.

कौटुंबिक दबावामुळे महिलांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. बाईला काळजीवाहू भूमिका बजावणे, नात्यांची जपणूक करणे, घरातील तसेच शेतीची कामे बघणे ही कामे आहेतच. आरक्षणाने जरी महिलांना संधी उपलब्ध करून दिली असली तरी त्यांनी दैनंदिन राजकारणात सहभागी होऊ नये यासाठी त्यांच्या कुटुंबाकडून होणारा दबाव महिलांना सहन करावा लागतो. काही म हिला त्यांच्यात राजकीय कौटुंबिक पार्श्वभूमी असल्यामुळे कुटुंबातच

राजकारण शिकतात. जातीव्यवस्था आणि समाजातून वगळणे असे प्रकार अजूनही गावात अस्तित्वात आहेत. त्यामुळे गरीब आणि अनुसूचित जातीच्या महिलांना त्यांच्या कुटुंबाकडून विरोध सहन करावा लागतो. जरी महिलांनी आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्ण करून इतरांसाठी काम केलं तरी त्यांच्या स्वतःच्या कुटुंबाकडून त्यांना पाठींबा आणि कौतुक सहसा मिळत नाही.

महिलांना आपल्या कुटुंबासोबत वागतांना नेहमी नम्र व चतुरपणे वागावे लागते. कुटुंबाचे वेगवेगळे पैलू हाताळतांना महिलांनी विविध सोप्या अस्त्रांचा वापर केला, उदा. वेळेचे नियोजन, निर्णय प्रक्रियेत कुटुंबाचा सहभाग वाढविणे आणि आपल्या कामासंबंधीच्या संवादात स्पष्टता आणणे इत्यादी. काही घटनांमध्ये तणाव टाळण्यासाठी महिलांनी सहनशील राहणेच पसंत केले. जर संघर्ष झालाच तर विरेचनाच्या पद्धतीप्रमाणे रडून आपल्या भावनांना वाट मोकळी करुन दिली.



ग्रामपंचायतीमध्ये काम करण्यासाठी वेळ मिळावा, यासाठी महिलांनी कुटुंबातील मंडळींमध्ये कामाची विभागणी करून दिली तसेच काही जबाबदाऱ्या त्यांनी स्वतःहून घ्याव्यात यासाठी विचारणा केली. कुटुंबातील व्यक्तींकडून पाठिंबा आणि विश्वास मिळविण्यासाठी महिलांनी त्यांना विविध कार्यक्रमांमध्ये आणि निर्णयांमध्ये सहभागी करून घेतले. तसेच शक्य असेल तिथे आपल्या सोबत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची ओळख करून दिली.

नवयुगातल्या या पारंपारीक जगात सासू आणि सून यांच्यातील संबंध हा वादाचा मुद्दा राहिला असला तरी, हा वाद टाळण्यासाठी महिलांनी सासूबरोबर बळकट संबंध निर्माण करून सासू-सुनेचे नाते अधिक विश्वसनीय आणि आधार देणारे बनविले आहे. याचा फायदा महिलांना त्यांच्या कामातील सहभाग वाढविण्यासाठी झाला. महिलांनी बऱ्याचदा घरातील मंडळींकडून होणारा अत्याचारही सहन केला. शिवाय भविष्यकाळातही आवश्यक असणारा पाठिंबा मिळविण्याच्या हेतूने त्यांनी कुटुंबातील मंडळींच्या या दृष्टीकोनाविषयीची माहिती इतरांना दिली नाही. या महिलांनी तणावाच्या परिस्थितीत आपल्या कुटुंबाची साथ देणे हे त्यांच्यासाठी फायदेशीर ठरले. आरक्षणामुळे महिलांना राजकीय कामात येण्याची संधी मिळाली आणि कुटुंबाला सोबत घेऊन केलेल्या नियोजनामुळे पुढे जाण्याची प्रेरणा मिळाली. शेती हा अर्थव्यवस्थेचा भाग असल्यामुळे गावातील बहुतेक महिलांना शेती व मशागतीच्या कामांमध्ये सहभागी व्हावे लागते. शेती मध्ये असणाऱ्या कामाच्या प्रचंड ताणामुळे महिलांना राजकीय कामात सहभागी होता येत नाही. त्यावर उपाय म्हणून शक्य असल्यास मनुष्यबळ बाहेरून घेऊन शेतीपासून उत्पन्न मिळवणे; जे त्यांच्यासाठी उपजिविकेचे एकमेव साधन आहे. हे उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांनी विकसित व आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केला आहे. काही महिलांनी आठवड्यातील एक दिवस ग्रामपंचायतीच्या कामासाठी राखून ठेवला आहे. जेणे करून शेती आणि ग्रामपंचायत या दोघांवरही कामाचा परिणाम होणार नाही. तसेच काही महिला सामाजिक संस्थांत काम करून किंवा शिलाई काम करून आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावत असतात. स्वयंसहाय्यता गटात महिलांनी दैनंदिन खर्चाचा हिशोब ठेवल्यामुळे त्यांना आर्थिक बाबी कशा हाताळायच्या, हे शिकता आले; शिवाय त्यांना अनावश्यक व टाळता येण्याजोग्या खर्चाची माहिती ही मिळाली. कोणत्याही मालमत्तेचा पाहिला हक्क हा नेहमी पुरूषांचा असतो मात्र काही महिलांनी मालमत्ता मालकी हक्कासाठी आपल्या कुटुंबासोबत संघर्षही केला.

कारभारणींनी सरकारी योजनांच्या योग्य अंमलबजावणीतून गावाचा विकास करून आपले नेतृत्व सिध्द केले आहे. गावातील विविध मुद्दे आणि समस्यांवरती काम करीत असतांना वर्षानुवर्षे सत्ता भोगणाऱ्या उच्चजातीय व उच्चवर्गीय समजल्या जाणाऱ्या, तसेच गावातील संसाधनांवर अधिकार गाजविणाऱ्या सत्ताधारी वर्गाकडून खूप विरोध सहन करावा लागला. अशा सत्ताधाऱ्यांना गावकऱ्यांकडून कधीही विरोध झाला नव्हता. त्यांना कोणत्याही पातळीवर कुणीही आव्हान केलं नव्हतं. मात्र आरक्षणामुळे महिला सत्तेत आल्या, आणि ही परिस्थिती बदलायला लागली. विरोधकांसाठी महिलांच्या नेतृत्वाचा नुसता विचारही करणे आणि ते स्वीकारणे खूप अवघड होते. त्यामुळे त्यांनी साहजिकच महिलांच्या कामात अडथळे आणायला सुरूवात केली.

महिला आणि तिच्या घरातील मंडळींना असभ्य भाषा वापरून, मुद्दाम ग्रामसभेमध्ये आणण्याची रणनीती विरोधकांकडून नेहमी वापरली गेली. महिलांनी गावात काही भरीव कामे करून विरोधकांना एक प्रकारे आव्हानच दिले. त्यामुळे विरोधकांच्या मनात भीती निर्माण झाली. निवडणूकी दरम्यान विरोधकांनी पैसे व दारूची लालूच दाखवून मतदारांना प्रभावित करण्याचा प्रयत्न केला. महिला लोकप्रतिनिधी बनल्या तरी विरोधकांच्या म्हणण्यानुसार ज्यांना काम करावे लागले त्या त्यांच्या हातातील बळीचा बकरा बनल्या.

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

विरोधकांनी महिलांवर कलम १४ जी (१४ ग) च्या अंतर्गत भ्रष्टाचारासारख्या केसेस दाखल करून त्यांना नाउमेद करण्याचाही प्रयत्न केला.

दुसऱ्या बाजूला, निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींना गावाच्या विकासाच्या संदर्भात होणाऱ्या निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढविण्याची आवश्यकता वाटत होती. मात्र विरोधकांनी गाव समित्यांमधील महिलांच्या ५० टक्के आरक्षणाला विरोध केला. महिलांच्या या बौध्दीक बदलाला नियंत्रित करण्यासाठी विरोधकांनी त्यांच्यावर अविश्वासाचे ठराव आणले. त्यांनी महिलांच्या  निर्णयाला विरोध केला, तसेच ग्रामसभेचे काही महत्वाचे आणि सुनियोजित कार्यक्रमही रद्द केले. त्यांनी ग्रामसभेत होणाऱ्या निर्णयांची तसेच आर्थिक बाबींची माहिती महिलांनाच दिली नाही, अडथळ्यात भर म्हणून की काय, महिलांनी निवडणूका लढवू नये यासाठी दबावतंत्र आणि हिंसाचाराला साथ द्यावी यासाठी त्यांनी महिलांना लाचही देऊ केली,त्याचा काही उपयोग होत नाही हे लक्षात येताच महिलांच्या चारित्र्यहननाच्या माध्यमातून राजकारणापासून परावृत्त करण्यासाठी त्यांच्यावर जबरदस्तीही केली.

विरोधकांसाठी निवडून आलेल्या महिला प्रतिनिधीकडे, एकच उत्तर होते आणि ते म्हणजे ग्रामसभेच्या माध्यमातून गावकऱ्यांच्या संमतीने सरकारी योजनांची योग्यरीत्या अंमलबजावणी करून गावाचा विकास करणे. कोणत्याही विकासात्मक कामाची रूपरेषा ठरवितांना लिंगभाव व संवेदनाशीलता हा निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींचा महत्वाचा विषय राहिलेला आहे. गावातील विकासात्मक कामासंदर्भातील निर्णय प्रक्रियेत महिलांची भागीदारी टिकविण्यासाठी त्यांनी महिलांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढविली. त्यामुळे विरोधकांचा विरोध कमी व्हायला मदत झाली. ज्या ठिकाणी विरोधक ग्रामपंचायतसंदर्भातील काही आर्थिक आणि इतर बाबींची माहिती सांगायला काकू करत होते, तीच माहिती सरकारी कार्यालये आणि माहितीचा अधिकार कायदा २००५ यांच्या माध्यमातून गोळा केली. गावसमितीतील सदस्य निवडीचा निर्णय ग्रामसभेतून घेतला गेल्यामुळे महिलांना ग्रामसभेचा पाठिंबा मिळाला. निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींनी गाव समित्यांमधील महिलांच्या ५० टक्के जागांसाठी संघर्ष केला.

विरोधकांनी वापरलेल्या विविध क्लृप्त्या आणि डावपेच शिकून घेऊन व त्याचा अवलंब करून त्यांना त्यांच्याच भाषेत कारभारणींनी उत्तरं दिली. काहींनी पुढाकार घेऊन विरोधकांशी संवाद सुरू केला आणि गावाच्या संपूर्ण विकासासाठी सहाय्य करण्याचे आवाहन केले. काहीजणींनी गावाच्या विकासाच्या मुद्यांसंदर्भात महिलांमध्ये जागृती केली, विकास कामांवर लक्ष केंद्रीत केले, महिलांचा पाठींबा टिकवून ठेवला आणि विरोधकांकडे दुर्लक्ष केले. विरोधकांच्या विरोधाची तीव्रता कमी व्हावी यासाठी त्यांनी विरोधकांच्या घरातील मंडळीसोबत चांगले संबंध प्रस्थापित केले. महिलांचे नेतृत्व मान्य व्हावे यासाठी समान मुद्दे उपस्थित करणे, विरोधकांच्या दृष्टीने महत्वाचे असणारे प्रश्न सोडविणे या नेहमी कामी येणाऱ्या साध्या डावपेचांचा वापर केला. गावातील मुद्यांसंदर्भात विरोधकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी महिलांनी स्वतः पूर्ण केलेल्या कामाचे श्रेय विरोधकांना दिले. विविध सरकारी अध्यादेशांचा अभ्यास सुरू केला. शिवाय या अध्यादेशांच्या माध्यमातून गावकऱ्यामध्ये जाणीवजागृती करण्याचे कामही सुरू केले.

यासोबतच राजकारणातही जातीची भूमिका महत्त्वाची आहे. जाती आधारावर भेदभाव ही सगळीकडे आढळणारी अदभूत गोष्ट आहे. भारतीय राजकारणात महिलांना मर्यादित प्रवेश आहे आणि जर ती महिला अनुसूचित जातीतील असेल तर तिला विविध प्रकारच्या जातीय भेदभावांना सामोरे जावे लागते ते मुख्यतः दोन कारणांसाठी एक म्हणजे, ती महिला राजकारणात जाण्याचा विचार करते, त्याच क्षणी तिच्या संघर्षाला सुरुवात होते. महिलांना निवडणूकीसाठी अर्ज भरताना व निवडणूक प्रचारापासूनच विविध समस्यांचा सामना करावा लगतो. निवडणूक जिंकल्यानंतरही उच्चजातीतील काही लोकांकडून होणाऱ्या असहयोगामुळे त्यांचा संघर्ष सुरूच रहातो. निवडणूकी दरम्यान उच्चजातीय समजल्या जाणाऱ्या लोकांकडून असा प्रचार केला जातो की खालच्या समजल्या जाणाऱ्या जातीतील महिला उपजीविका आणि ग्रामपंचायतीमधील काम याचा समतोल राखू शकत नाही. वरच्या जातीतील महिलांनी जर खालच्या समजल्या जाणाऱ्या लोकांना सहाय्य केले अथवा त्यांच्यासाठी काम केले तर त्यांना त्यांच्याच जातीतील लोकांकडून विरोध केला जातो. सुशिक्षित लोकही दलित महिलांसमवेत असहकार्याची भूमिका घेतात ही खेदाची गोष्ट आहे. राजकारणात गावाच्या विकासापेक्षा जात हा महत्त्वपूर्ण घटक असतो.

गावातील जातीभेद कमी करण्यासाठी निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींनी विविध डावपेचांचा वापर केला. उदा. उच्च समजल्या जाणाऱ्या जातीतील लोकांसमवेत संवाद साधणे, जाती निहाय स्वयंसहायता गटाची बांधणी करून त्यांच्याशी नातेसंबंध टिकविणे आणि गावाच्या विकासासाठी गावातच आधार तयार केला. काही प्रतिनिधींनी जाती-आधारीत भेदभावांकडे दुर्लक्ष केले. त्यांचा विश्वास आहे की समाज हळूहळू बदलेल. विधवा महिलांचं समाजातील सन्मान व सामाजिक स्थान हे अत्यंत निराशाजनक आहे. सामाजिक संकेतांनी नेहमीच विधवा महिलांच्या कौटुंबिक तसेच सार्वजनिक कार्यातील सहभागाला अटकाव केला आहे. मात्र महिलांनी धार्मिक आणि समाजिक कार्यक्रमांमध्ये भगिनींना शैक्षणिक भेटवस्तू देऊन परिस्थिती थोडी बदलली आहे.

गावाच्या विकासासाठी महिला लोकशाही मार्गाने निवडून आल्या. विविध योजना मांडून कारभारणी त्या मंजूर करून घेतात. मात्र त्यांच्या अंमलबजावणीचं काम सरकारी अधिकारी करतात. सरकारी अधिकाऱ्याना अंमलबजावणीसाठीची योजना व तिच्यावर होणारा खर्च ठरविण्याचा अधिकार असतो. सरकारी कर्मचारी हे विविध संघटनांच्या माध्यमातून संघटित होतात. त्यांना लोकाभिम



ुख करणे हेच एक आव्हान असते. सत्तेच्या विकेंद्रीकरणामध्ये ग्रामसभेला गावाच्या विकासाचे निर्णय घेण्याचे अधिकार असतात. ग्रामसभेत घेतलेले निर्णय अंमलात आणणे हे सरकारी कर्मचारी आणि निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या हातात असते. ते दोघेही एकमेकावर अवलंबून असतात, खेड्याच्या विकासासाठी महत्वाच्या असणाऱ्या योजनांची अंमलबजावणी करतांना अधिकारी हे त्यांच्या जबाबदाऱ्या पूर्ण न करण्याबाबत, माहिती लपविण्यासाठी आणि निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींबरोबरच्या असहाकार्याबाबत प्रसिध्द आहेत.

काही ग्रामसेवक प्रभावी महिला प्रतिनिधींचे काम दुर्लक्षित करतात. शिवाय ते महिलांच्या बाबतीत असंवेदनशील असतात. या महिलांना आर्थिक बाबतीतील माहिती घेतांना संघर्ष करावा लागला. काही वेळा, स्वतःचा भ्रष्टाचार लपविण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांनी महिलांना लाचेचे आमिष दाखविलं. समाजाचा विकास साधण्यासाठी अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेचा पाठिंबा असणे आवश्यक असते. जनतेचा त्यांच्या अधिकारांवर हक्क सांगून आणि हे काम करणे अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे याची त्यांना आठवण करून देऊन गावाचे काम साध्य करता येऊ शकते. माहिला प्रतिनिधींनी सरकारी अध्यादेशांचा अभ्यास करून योजनांच्या अंमलबजावणीसाठी चांगला दबाव निर्माण केला. सरकारी सेवकांनी ग्रामपंचायतीच्या कार्यपध्दतीतील माहिती लपविण्याचा प्रयत्न केला, पण महिलांनी माहितीचा अधिकार वापरून ही माहिती मिळविली व महिलांनी सरकारी योजनांच्या बाबतीत ग्रामस्थांची मते आजमावून घेतली आणि ग्रामस्थांच्या परवानगीने त्यांची अंमलबजावणी केली. या योजनांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी ग्रामस्थांच्या गावसमित्यांचीही स्थापना केली.

सरकारी अधिकाऱ्यांना गावाच्या विकासात काही ठिकाणी लोकसहभाग नको होता आणि म्हणूनच त्यांनी ग्रामसभा बोलविण्यात टाळाटाळ केली. महिला प्रतिनिधींनी इतर सदस्यांमध्ये जागरूकता वाढवून ग्रामसभा घेण्यासाठी अधिकाऱ्यावर दबाव आणला. कारभारणींनी गावासाठी मंजूर झालेल्या आर्थिक तरतुदीची माहिती गावकऱ्यांना देण्याची पारदर्शकता दाखविली. तसेच ग्रामस्थांना योजना अंमलबजावणीच्या परिणामांवर लक्ष ठेवण्याचे आवाहनही केले. किचकट सरकारी पद्धती बदलण्यासाठी, ती लोकाभिमुख करण्यासाठी, तसेच शाळेच्या सुधारणांसाठी सह्याची मोहिम राबविली. महिला राजसत्ता आंदोलनाने महाराष्ट्रात प्रशासनाच्या क्षेत्रात आपल्या मौल्यवान आणि स्तुत्य कामगिरीने स्वःचे स्थान निर्माण केले आहे. या स्थानाचा उपयोग, महिला नोकशाहीबरोबर काम करतांना निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींच्या भूमिकेला न्याय देण्यासाठी नेहमी प्रयत्नपूर्वक करतात.

ग्रामपंचायत निवडणुकांत राजकीय पक्षांचा प्रत्यक्ष सहभाग जरी दिसत नसला तरी अप्रत्यक्षपणे हे पक्ष मोठ्या प्रमाणात सक्रिय असतात. राजकीय पक्ष आपल्या गटांमार्फत निवडणूक लढवितात व अशा गटांमार्फत उमेदवारी मिळाविणे महिलांना अतिशय कठीण जाते. राजकीय पक्षात आपले स्थान निर्माण करणे हाच महिलांसाठी मोठा संघर्ष असतो. शिवाय राजकीय पक्ष, फक्त निवडणूकीच्या काळातच संपर्क करतात. कार्यशील महिलांना फक्त राजकीय पक्षांकडूनच नव्हे तर पक्षातील कार्यकर्त्यांकडूनही निवडणूक लढविण्यासाठी विरोध होतो. राजकीय पक्षांची, समाजातील प्रतिमा गोंधळाची असल्यामुळे महिलांसाठी राजकीय पक्ष आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवणे कठीण असते. काही वेळा महिला, पक्षाची सभासद असली तरी वैयक्तिक मुल्ये आणि पक्षांची मूल्ये समान नसतात. जिथे निवडणूकीसाठी आणि ग्रामपंचायतस्तरावर पक्षांचा पाठींबा मिळत नाही, तिथं निवडणूकीच्या माध्यमातून एखाद्या पक्षासोबत काम करण्याची महिलेची इच्छाही स्विकारली जात नाही. त्यामुळेच राजकीय पक्षात स्वतःसाठी, कायम स्वरूपी आणि टिकावू पर्याय निर्माण करणे महिलांसाठी कठिण काम बनलं आहे. काही ठिकाणी, राजकीय पक्षांकडून उमेदवारी न मिळाल्यांने माहिलानी स्वतंत्रपणे अपक्ष म्हणून निवडणूक लढविली. महिलांना हा विश्वास होता की कठोर परिश्रम आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर त्यांना राजकीय पक्षात स्थान मिळेल. पक्षांची विचार सरणी समजून घेण्यासाठी महिलांनी पक्ष कार्यकर्ते आणि राजकीय अभ्यासकांशी संवाद साधला. विविध पक्षातील महिलांनी राजकीय समन्वयाच्या बांधणीसाठी समान मुद्यांच्या सोडवणूकीत एकमेकींना मदत केली.


राजकारणाच्या पंचायतीत-पती, परिवार, विरोधक, अधिकारी व पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधतांना त्यांचे वादात रूपांतर होऊ नये, तो सुसंवाद व्हावा असा कारभारणीं नेहमी प्रयत्न करतात. परंतु, असभ्यता ओलांडली गेल्यास; त्या साम-दाम-दंड भेद याहून वेगळ्या रणनीतीही शोधतात हे खरं! या महिलांनी सत्ता मंडळांना भेदायला सुरुवात नक्की केली आहे!

महिला भेदीले सत्तामंडळा जिंकेल का ती नव्या आव्हानां?

– हे आपण सारे त्यांची कशी साथ करणार या आधारेच ठरणार!



# महाविद्यालयातील नकोसे गॉसिपिंग...




**सिंगल वुमन म्हणून राहणाऱ्या साधना मॅडमना कॉलेजातील सहकारी प्राध्यापकच त्रास देत होते. आयोगाकडे तक्रार आल्यानंतर याबाबत सर्व संबंधितांशी बोलून मार्ग काढण्यात आला.**

## धनंजय बिजले

नामांकित शहरातील नामांकित महाविद्यालय... खरं तर ते फार जुने म्हणता येणार नाही. पण तरीही त्याला स्थापन होऊन पंचवीस-एक वर्षे झालेली. इतक्या कमी कालावधीत या महाविद्यालयाने शिक्षणाच्या क्षेत्रात स्वतःचे असे खास स्थान निर्माण केले होते. गेल्या दहा वर्षांत तर या महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेच्या जोरावर अन्य स्पर्धक महाविद्यालयांना फारच मागे टाकले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांची पहिली पसंती याच महाविद्यालयाला असायची. या महाविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना नेहमीच शिकस्त करावी लागे. कारण, महाविद्यालयातील शिक्षणाची गुणवत्ता वाखाणण्यासारखी होती. त्यामुळे शहरातील तसेच आसपासच्या अन्य गावांतील विद्यार्थी येथे शिकण्यास प्राधान्य देत असत. महाविद्यालयातील प्राध्यापकदेखील हुशार म्हणूनच प्रसिद्ध होते. त्यांनीच तर महाविद्यालयातील शिक्षणाचा दर्जा सांभाळला होता. गेल्या काही वर्षांत शिक्षणाचा दर्जा घसरल्याचे आपण नेहमी ऐकतो, पाहतो. मात्र हे महाविद्यालय त्याला अपवाद होता.

नव्या पिढीचे, ताज्या दमाचे व उत्साहाने विद्यार्थ्यांना शिकवणारे प्राध्यपक हे या महाविद्यालयाचे खरे बलस्थान होते. कला, वाणिज्य व विज्ञान अशा तिन्ही शाखांचे विद्यार्थी येथे शिकत असत. महाविद्यालयातील वातावरण तसे म्हटले तर मोकळे होते, तर जेथे पाहिजे तेथे चांगली शिस्त होती. विद्यार्थ्यांच्या कलागुणांची जोपासना करण्याबरोबरच अभ्यासाच्या बाबतीत येथे कोणत्याही प्रकारची हेळसांड केली जात नसे. त्यामुळे मुलांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने येथील वातावरण तसे फारच पोषक होते.

अनेक शिक्षक, प्राध्यापक विद्यार्थ्यांचे खूप लाडके होते. साधना (मूळ नाव बदलले आहे) मॅडम या त्यापैकीच एक. साधना मॅडम तशा सायन्स फॅकल्टीच्या प्राध्यापिका. अतिशय हुशार. आपल्या शैक्षणिक कारकिर्दीत त्यांनी नेहमीच पहिला क्रमांक मिळवलेला. इतकेच काय... विद्यापीठातही त्यांनी गोल्ड मेडल पटकाविलेले.

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

त्यामुळे त्यांच्या विषयात त्या पारंगत होत्याच. अर्थात, केवळ स्वतः हुशार असून भागत नाही. शिकवण्याचीदेखील एक वेगळी कला असावीच लागते. ती कला साधना मॅडमकडे होती. कोणताही क्लिष्ट व अवघड विषय समोरच्या विद्यार्थ्यांना समजेल अशा पद्धतीने शिकवण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यामुळेच त्यांचे लेक्चर कोणीही बंक करत नसे. त्यांच्या तासाला चुकून कोणाला उपस्थित राहता आले नाही तर त्या विद्यार्थ्याला चुटपूट लागत असे. सहसा महाविद्यालयात असे होत नाही; पण साधना मॅडमच्या लेक्चरला मात्र हे होत होते, हे मात्र नक्की.

तशा साधना मॅडम गेली दहा वर्षे अध्यापन क्षेत्रात होत्या. मात्र या शहरात व या महाविद्यालयात त्या चारच वर्षांपूर्वी आलेल्या. या आधी त्या दुसऱ्या शहरात राहत होत्या व तेथील महाविद्यालयात शिकवीत होत्या. कौटुंबिक समस्यांमुळे त्यांना घर सोडावे लागले. मग त्या शहरात त्यांचे मन रमेना. शेवटी त्यांनी शहर सोडायचा निर्णय घेतला. त्यांच्यासारख्या हुशार व्यक्तीला नोकरी मिळण्याचा फारसा प्रश्न नव्हता. झालेही अगदी तसेच. या शहरात येताच त्यांना याच नामांकित महाविद्यालयात नोकरी मिळाली. सिंगल वूमन म्हणून राहताना पहिले एक वर्ष त्यांना नव्या शहरातील तसेच महाविद्यालयातील वातारणाशी जुळवून घेण्यात थोडा त्रास झाला. पण नंतर मात्र त्या येथे चांगल्याच रुळल्या व रमल्या. अर्थात, त्याला त्यांचा स्वभाव कारणीभूत होता. सर्वांशी मिळून-मिसळून वागणे, मितभाषी स्वभाव, कोणाच्या अध्यात-मध्यात न जाणे, आपल्या कामाशी प्रामाणिक राहणे, ही त्यांच्या स्वभावाची काही वैशिष्ट्ये होतीच. शिवाय दुसर्यांना त्या पटकन मदत करीत. विद्यार्थ्यांच्या कोणत्याही अडचणींच्या वेळी त्या सर्वांत आधी मदतीला पुढे येत असत.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांचे शिकवणे. अभ्यासात फारसी गती नसलेल्या विद्यार्थ्यांनाही त्यांचे शिकवणे समजत असे. समजले नाही तर त्या पुन्हा समजावून सांगण्यात कंटाळा करत नसत. त्यामुळे ज्यांना सायन्स अवघड वाटायचे, त्यांनाही आता ते सोपे वाटू लागले होते. अर्थात, सायन्स शिकवत असतानाही त्या महाविद्यालयातील इतर कार्यक्रम तसेच उपक्रमात हिरिरीने सहभागी होत असत. स्टडी टूर असो की महाविद्यालयातील एखादी मोठी कॉन्फरन्स किंवा सम रंभ... साधना मॅडम यांचा त्यात सहभाग नाही, असे कधी घडायचेच नाही. किंबहुना अनेकदा त्यांच्याच शिरावर सारी जबाबदारी असायची. महाविद्यालयाचे प्राचार्य त्यांच्यावर एखादी जबाबदारी सोपविली की निश्चिंत असायचे. त्यांना दिलेली जबाबदारी त्या यशस्वीपणे पार पाडणार, याबाबत कोणाच्याही मनात तिळम त्र शंका नसायची.

त्यांच्या या गुणामुळे साधना मॅडम अवघ्या पाच वर्षांत साऱ्या महाविद्यालयात कमालीच्या लोकप्रिय झाल्या होत्या. विद्यार्थ्यांच्या तर त्या लाडक्या होत्याच. मात्र आता त्या प्राचार्य व संस्थेतील वरिष्ठ पदाधिकार्यांच्याही विश्वासू सहकारी बनल्या होत्या. त्यांची ही वाढती लोकप्रियता महाविद्यालयातील अनेकांच्या डोळ्यांत खुपत असे. त्यात येथील जुन्या प्राध्यापकांचा समावेश होता. कानामागून आली आणि तिखट झाली या म्हणीप्रमाणे त्यांना साधना मॅडमचा वाढता प्रभाव वाटत होता. खरे तर हे सारे साधना मॅडम मुद्दाम कोणाला त्रास देण्यासाठी किंवा आपणच कसे चांगले आहोत, हे दाखविण्यासाठी मुळीच वागत नव्हत्या. त्यांचा मूळचा स्वभावच सर्वांना मदत करण्याचा होता. सर्व कामे मनापासून करण्यात त्यांना आनंद मिळत असे. दुसर्यांनीही तसेच असावे याबाबत त्या कधी आग्रही राहत नसत. आपले बरे आणि आपण बरे, असाच त्यांचा स्वभाव होता आणि विद्यार्थ्यांना शिकवण्यात तर त्यांना भलताच आनंद मिळत असे.

पण अनेकांना त्यातल्या त्यात कामचुकार लोकांना त्यांची काम ाची ही पद्धत डाचत होती. त्यातही ज्यांचा आधी महाविद्यालयात प्रभाव होता, त्या प्राध्यापकांची साधना मॅडम आल्यामुळे थोडी अडचणच झाली होती. कारण, आता प्राचार्य अनेकदा त्यांना काहीही विचारत नसत. यापूर्वी ज्या गोष्टींत त्यांचे मत विचारात घेतले जात असे, त्याऐवजी अनेक निर्णय साधना मॅडमशी चर्चा होऊनच घेतले जात असत. अनेकदा जुन्या प्राध्यापकांना निर्णय झाल्यानंतरच तो समजत असे. त्यामुळे त्यांची चिडचिड होणे स्वाभाविक होते. पण खरे तर यात साधना मॅडमचा काहीच दोष नव्हता. मात्र, त्यांनाही प्राध्यपकांची ही अडचण समजत होती. पण त्यात त्या काही करू शकत नव्हत्या. कारण, प्राचार्यांनी कोणाला विचारायचे, काय सांगायचे हा त्यांचा प्रश्न नव्हता. शिवाय प्राचार्यांना काही समजावून सांगण्याइतक्या त्या काही सिनियरदेखील नव्हत्या.

मात्र अनेक जण त्यांच्यावर अलीकडे डूख धरू लागले होते. त्यांच्या परोक्ष त्यांना नावे ठेवू लागले होते. प्राचार्यांच्या कानावरदेखील साधना मॅडमबाबत काहींनी तक्रारी करण्यास सुरुवात केली होती. मात्र प्राचार्यांनी त्याकडे कधी फारसे गांभीर्याने लक्ष दिले नाही. मात्र, एक प्राध्यापक त्यांच्याबाबत फारच नाराज होता. कारण, साधना मॅडम जो विषय शिकवतात तोच विषय ते प्राध्यापक आधी शिकवत असत. मात्र, साधना मॅडम आल्यापासून त्यांची फारच अडचण झाली होती. कारण, साधना मॅडम विद्यार्थ्यांत इतक्या लोकप्रिय झाल्या होत्या की बोलता सोय नाही. या प्राध्यापकांना कोणी विद्यार्थी विचारेनासा झाला होता. त्यांच्याकडे साधी शंका घेऊन तर कोणी यायाचेच नाही. शिवाय त्यांच्या लेक्चरला अनेक जण बिनदास्त दांडी मारायचे. यामुळे त्यांना अपमानित झाल्यासारखे वाटायचे. पण याला



त्यांची स्वतःचीच वागणूक कारणीभूत होती, असे म्हटले तर वावगे ठरणारे नव्हते. कारण, ते कधीही वर्गात वेळेवर येत नसत, लेक्चरला येण्यापूर्वी जे शिकवायचे आहे त्याची पूर्वतयारी करून येत नसत. शिवाय ते शिकवतानाही त्यांचे त्यात फारसे लक्ष नसायचे. आधी त्यांना पर्याय नव्हता, त्यामुळे त्यांचे चालून गेले. पण जेव्हा साधना मॅडमच्या रूपाने त्यांना व विद्यार्थ्यांनादेखील पर्याय उपलब्ध झाला त्या वेळी या प्राध्यापक महाशयांची चांगलीच गोची झाली होती. आता त्यांना शिकवण्यासाठी शिकस्त करावी लागत होती. इतके करूनही त्याचा फारसा उपयोग होत नव्हता. मग त्यांनी महिलेच्या बाबतीत एखादा पुरुष ज्याप्रमाणे वागू लागतो, तसे वागायला सुरुवात केली. म्हणजे त्यांनी साधना मॅडम यांची टवाळी सुरू केली. त्या नसताना त्यांच्या मागे काही तरी कंड्या पिकवण्यास सुरुवात केली. लोकांना एखाद्या महिलेविषयी चर्चा करण्यास कोणतेही कारण पुरते. त्यांना हे प्राध्यापक आयतेच खाद्य पुरवू लागले. त्यांनी हळू हळू गॉसिपिंग करायला सुरुवात केली. ते हे जाणूनबूजन करत होते की रागाच्या भरात त्यांच्याकडून ही कृती होत होती कोणास ठाऊक? पण एक मात्र खरे की, साधन मॅडमची निंदानालस्ती करणे हा त्यांचा जणू दिनक्रमच बनला होता. साधा मॅडम कोणाशी बोलल्या, कोणाबरोबर चहाला गेल्या, घरी जाताना कोणाशी गप्पा मारत होत्या... असल्या फालतू बाबतीत हे प्राध्यापक दररोज कंड्या पिकवू लागले. सुरवातीला साधना मॅडमला यातील काहीच माहिती नव्हते. मात्र नंतर नंतर त्यांच्याही कानी या गोष्टी येऊ लागल्या. महाविद्यालयातील महिला सहकारीदेखील त्यांना याबाबत विचारणा करू लागल्या. साधना मॅडम यामुळे हैराण होऊ लागल्या. त्यांच्या सहकारी मैत्रिणीदेखील साधना मॅडमकडे आता विचित्र नजरेने पाहू लागल्या. आपण कोणाशी बोलतो, कसे राहतो, काय खातो असल्या बाबींकडेही लोक लक्ष देतात. मला त्यावरून शेरेबाजी करतात... ही बाबच साधना मॅडमना रुचत नव्हती. मात्र वर्किंग वूमन म्हणून समाजात वावरताना काही वाईट लोकही भेटणारच, असे म्हणून त्या हा विषय सोडून देत असत.

सुरवातीला त्यांनी याकडे दुर्लक्ष करण्याचे ठरविले. पण या प्राध्यापकांनी त्यांचे प्रतिमाहनन करणे सुरूच ठेवले. त्यात आता त्यांना अन्य प्राध्यापक मंडळीही त्रास देऊ लागली. ती जाता-येता कमेंट करू लागली. साधना मॅडम सिंगल वूमन होत्या, त्यामुळे त्यांच्याबाबतच्या कंड्या जास्तच वेगाने सुरू झाल्या. स्टाफरूममध्ये त्यांच्या शिकवण्याची त्यांच्यादेखत चेष्टा होऊ लागली. त्यांना उत्तर द्यावे तर पंचायत... न द्यावे तरी पंचायत... अशी परिस्थिती साधना मॅडमची झाली. त्या ऐकून न ऐकण्यासारखे करू लागल्या. थोडक्यात, त्यांना ज्या महाविद्यालयात रोज आनंदाने जावे वाटत होते, तेथेच त्यांना आता असा त्रास सुरू झाला. एकदा तर हद्दच झाली... त्यांच्यावर चिडून असलेल्या एका प्राध्यापकाने साधना मॅडमचा सर्व वर्गादेखत अपमान केला. क्षुल्लक गोष्टीवरून साधना मॅडमना हे प्राध्यापक अपम ानकारक बोलले. सुरुवातीला या प्राध्यापकांच्या सर्व बाबींकडे दुर्लक्ष करणाऱ्या साधना मॅडम आता
मात्र चांगल्याच अस्वस्थ झाल्या. पाणी आता डोक्यावरून जात आहे असेच त्यांना वाटले. आता शांत बसले तर काम करणेच अवघड होईल, याची त्यांना खात्री पटली.

मग त्यांनी मग थेट प्राचार्यांकडेच याबाबत तक्रार केली. त्या तक्रारीत केवळ वर्गातील प्रसंगच न सांगता त्यांनी मग या प्राध्यापकांचे सारे प्रताप सांगितले. आपल्या मागे येथील लोक माझी कशी निंदानालस्ती करतात, हेदेखील त्यांनी सांगितले. त्यांच्यावर प्राचार्य या नात्याने तुम्ही कारवाई केलीच पाहिजे, असेही सांगण्यास त्यांनी मागे-पुढे पाहिले नाही. याबाबत प्राचार्य काहीतरी ठोस पावले उचलतील, असे त्यांना वाटत होते. मात्र प्राचार्यांची वागणूक पाहून त्यांना धक्काच बसला. त्रास देणाऱ्या प्राध्यापकांकडे दुर्लक्ष करावे असेच प्राचार्य त्यांना सुचवू लागले. कारण, प्राचार्यांना साधना मॅडमच्या तक्रारीत कितपत तथ्य आहे, यापेक्षा महाविद्यालयाची यात बदनामी झाली तर काय?, याची जास्त चिंता लागली होती. ''अहो, मला काम करणे अवघड झाले आहे आणि तुम्ही मलाच समजावून सांगताय,'' असे साधना मॅडम त्यांना रागावूनच म्हणाल्या. पण तरीही प्राचार्य फारसे काही करण्याचा मनःस्थितीत दिसले नाहीत. जो प्राध्यापक तुम्हाला सर्वाधिक त्रास देत आहे, त्यांच्याविरुद्ध थेट विद्यापीठाकडेच तुम्ही दाद मागा, असे त्यांना प्राचार्यांनी सांगितले आणि हात झटकले. प्राचार्यांचे वागणे साधना मॅडम साठी अनपेक्षितच होते. पण त्यांनी आता माघार घ्यायची नाही, असे मनाशी ठरविले आणि थेट विद्यापीठाकडे तक्रार केली. महाविद्यालय संबंधित प्राध्यापकावर काहीही कारवाई करत नाही, हेदेखील त्यांनी तक्रारीत स्पष्टपणे नमूद केले.

विद्यापीठाने साधना मॅडमच्या या तक्रारीची दखल घेत राज्य महिला आयोगाला सविस्तर पत्र लिहिले. योग्य ती कारवाई करण्यास महाविद्यालय टाळाटाळ करीत असल्याचेही विद्यापीठाने यात नमूद केले होते. आयोगाच्या अध्यक्षा विजयाताई रहाटकर यांनी विद्यापीठाच्या या पत्राची गंभीर दखल घेतली. आज प्राध्यापिकेला त्रास होत आहे, उद्या विद्यार्थिनींना त्रास झाल्यास महाविद्यालय असेच वागणार का? मानहानीला घाबरून बोटचेपी भूमिका घेणार का?, या प्रश्नांनी त्या अस्वस्थ झाल्या. त्यांनी तातडीने महाविद्यालयाशी संपर्क साधला. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, पदाधिकारी, साधना मॅडम, ज्यांच्याविरुद्ध तक्रार आहे ते प्राध्यापक यांना त्यांनी आयोगाच्या कार्यालयात बैठकीसाठी बोलाविले. साधना मॅडमच्या साऱ्या तक्रारींवर या बैठकीत सविस्तर ऊहापोह करण्यात आला. सर्वांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. त्या वेळी महाविद्यालयात कामाच्या ठिकाणी महिलांना होणाऱ्या त्रासाबाबतच्या कायद्याची अंमलबजावणी होत नसल्याचे सर्वांना सुनावण्यात आले. थेट महिला आयोगाने लक्ष घातल्याने आणि साधना मॅडमच्या मागे तो भक्कमपणे उभा राहिल्याने निंदानालस्ती करणाऱ्या प्राध्यापकांना जो मिळायचा तो संदेश मिळाला. त्यांनीही आपली चूक कबूल करत पुन्हा असे न वागण्याची लेखी हमी दिली. महाविद्यालयाचीही मानहानी टळली. अन्य प्राध्यापकांनाही यातून काय बोध मिळायचा तो मिळाला आणि अशाप्रकारे साधना मॅडमच्या मागची डोकेदुखी संपली.

# बांगला देशाची रणरागिणी



**राजकीय पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबात जन्मलेल्या बांगला देशाच्या पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांचे वर्णन रणरागिणी असेच करावे लागेल. बांगला देशातील लष्करी राजवटीविरुद्ध चिवटपणे झुंज देत त्यांनी बांगला देश आवामी लीग या पक्षाचे स्थान देशात मजबूत केलेच; शिवाय बांगला देशच्या अर्थव्यवस्थेलाही बळकटी देण्यातही त्यांनी मोलाचा वाटा उचलला आहे. पंतप्रधानपदाची धुरा तिसऱ्यांदा सांभाळणाऱ्या या रणरागिणीलाही गैरव्यवहार किंवा तत्सम आरोपांचा सामना करावा लागला असला, तरी त्यातून सावरून पुन्हा त्या पंतप्रधानपदाच्या शर्यतीस सज्ज झाल्या आहेत.**

**गोपाळ जोशी**
gopal.joshi19gmail.com

बांगला देश हा आपला सख्खा शेजारी. कधीकाळी आपल्याच बंगाल प्रांताचा असलेला हा भाग. फाळणीनंतर पूर्व पाकिस्तान म्हणून तो ओळखला जात असे. १९७१ च्या युद्धात पाकिस्तानच्या कचाट्यातून सुटका झाल्यानंतर बांगला देश या नावाने जगाच्या नकाशावर अवतरलेला हा तसा तुलनेने नवा आणि चिमुकला देश. या देशातील राजकारण फारच वैशिष्ट्यपूर्ण ठरावे असे आहे. मुस्लिमबहुल असलेल्या या देशाचे राजकारण शेख हसीना वाजेद आणि बेगम खालिदा झिया या दोन महिलांच्या हाती एकवटले आहे. मुस्लिम देशात महिला नेत्या इतक्या यशस्वी झाल्याचे जगात दुसरे उदाहरण नाही. त्यामुळेही या नेत्यांचा परिचय करून घेणे अगत्याचे आहे.

तत्कालीन पूर्व पाकिस्तानातील अवामी लीगचे नेते शेख मुजीबूर रहमान हे शेख हसीना वाजेद यांचे पिता. बांग्लाभाषकांच्या हितासाठी ते नेहमीच संघर्षरत राहिले. ढाक्याजवळच्या तुंगीपाडा या गावी २७ सप्टेंबर १९४८ रोजी हसीनांचा जन्म झाला. घरातच राजकीय वातावरण असल्याने हसीनाही किशोरवयापासूनच राजकारणात सहभागी होऊ लागल्या होत्या. ढाक्यातील ईडन गर्ल्स कॉलेजमध्ये असतानाच त्या अवामी लीग पक्षाच्या युवक शाखेत सक्रिय झाल्या होत्या. एम. ए. वाजेद यांच्याशी त्यांचा १९६८मध्ये विवाह झाला. लग्नानंतरही त्या पूर्व पाकिस्तानातील राजकीय चळवळीत सक्रिय राहिल्या. १९७०मध्ये शेख मुजीबूर यांना अटक झाल्यानंतर हसीना आणि त्यांच्या बहिणीला आजीसमवेत भारतात आश्रय घ्यावा लागला. माझे बालपण नेहमी असे तणावाच्या आणि काहीशा भीतीच्या

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

वातावरणातच गेले आहे, असे हसीना यांनी मध्यंतरी एका मुलाखतीत सांगितले होते. १९७१मध्ये बांगला देश स्वतंत्र झाला आणि या नवनिर्मित देशाचे पहिले अध्यक्ष म्हणून शेख मुजीबूर यांनी सूत्रे हाती घेतली. या पदावर ते उणेपुरे तीन एक वर्षेच काम करू शकले. १५ ऑगस्ट १९७५ रोजी ढाक्यात त्यांची हत्या करण्यात आली. त्यावेळी हसीना व त्यांच्या भगिनी तत्कालीन पश्चिम जर्मनीत असल्याने या हत्याकांडातून बचावल्या. शेख मुजीबूर यांच्या हत्येनंतर बांगला देशातील राजकारण व समाजकारण ढवळून निघाले होते. लष्कराने सत्ता काबीज केल्याने जीवनाच्या सर्वच अंगांवर बंधने आली होती. त्यामुळे हसिना यांनी मायदेशात जाण्यापेक्षा भारतात आश्रय घेणे पसंत केले. भारतात राहूनच त्या बांगला देशातील राजकारण पाहत होत्या. सुमारे सहा वर्षांनी म्हणजे १६ फेब्रुवारी १९८१ मध्ये त्यांची अवामी लीगच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली. त्याही वेळी त्या देशाबाहेरच होत्या. मात्र, पक्षाने टाकलेल्या या विश्वासामुळे त्यांनी मयादेशात परतण्याचा निर्णय गेतला आणि १७ मे १९८१ रोजी त्या ढाक्यास गेल्या,

त्यावेळी लष्करशहा जनरल इर्शाद यांच्या हाती सत्तासूत्रे एकवटली होती. शेख हसीना यांनी मायदेशात परतल्यानंतर प्रथम पक्षबांधणीकडे लक्ष दिले. पक्षाचे नेते व कार्यकर्त्यांचे मनोगत जाणून घेत त्यांनी पक्षाचे मनोबल उंचावले आणि जनरल इर्शाद यांच्या राजवटीलाच आव्हान देण्यास प्रारंभ केला. त्यामुळे शेख हसीना यांना सातत्याने नजरकैदेत ठेवले गेले. तरीही त्या डगमगल्या नाहीत. बांगला देश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या (बीएनपी) नेत्या बेगम खालिदा झिया यांना बरोबर घेऊन शेख हसीनांनी देशात लोकशाहीच्या पुन:स्थापनेसाठी संघर्ष सुरू केला. अवामी लीग आणि बीएनपीने संघर्ष एवढा तीव्र केला, की शेवटी जनरल इर्शाद यांना देशात निवडणूक जाहीर करावी लागली. १९८६ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीवर बेगम झियांच्या बीएनपीने या निवडणुकीवर बहिष्कार घातला, पण शेख हसिनांनी सर्व जागांवर लढत दिली. जनरल इर्शाद यांचीच सत्ता त्या निवडणुकीत निवडून आली हे खरे, शेख हसीना व त्यांच्या अवामी लीगला यातून खूप काही शिकायला मिळाले. अध्यक्ष इर्शाद यांच्या राजवटीत त्यांनी संसदेत विरोधी पक्षनेता म्हणून काम पाहिले. हा अनुभवही त्यांच्यासाठी मोलाचा ठरला. शेख हसीनांच्या या निर्णयावर बेगम झिया व बीएनपीने जोरदार टीका केली, पण शेख हसीनांनी ही टीका, आरोप मनावर न घेता काम सुरू ठेवले. शेख हसीनांनी वर्षभरातच विरोधी पक्षनेतेपदाचा राजीनामा देत इर्शाद सरकारवर दडपण आणले. त्यामुळे जनरल इर्शाद यांनी १९८७च्या नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये नव्याने निवडणुका घोषित केल्या. शेख हसीना यांच्यामुळेच जनरल इर्शाद यांच्या सत्तेला सुरुंग लागल्याचे तेव्हाही अनेक तज्ज्ञांचे मत होते आणि आजही तसेच मानले जाते. शेख हसीनांमधील रणरागिणीचे यापेक्षा वेगळे व यथार्थ वर्णन कोणते असू शकेल? असो. १९८७च्या अखेरीस जाहीर झालेल्या निवडणुकांदरम्यान देशभरात मोठा हिंसाचार झाला. ढाक्यात नागरिकांनी जनरल इर्शाद यांच्याविरोधात जोरदार निदर्शने केली. ही निदर्शने हाणून पाडण्यासाठी ढाक्यात गोळीबार झाला. त्यात अनेक माणसे मृत्यमुखी पडली.

बांगला देशातील राजकीय अस्थिरता व देशातील अशांत वातावरणाचा परिणाम अर्थव्यवस्थेवर पडत होता. चिमुकल्या बांगला देशची चिमुकली अर्थव्यवस्था यामुळे अगदीच नाजूक बनली होती. लोकांच्या हातांना काम नव्हते. आधीच बेकारी, त्यात लष्करशाही, यांमुळे कातावलेल्या सर्वसामान्य बंगबंधूंनी या लष्करशाहीविरुद्ध जोरदार संघर्ष सुरू केला. १९९०च्या डिसेंबरात या प्रक्षुब्ध जनमानसाने जनरल इर्शाद यांची राजवट उलथून टाकली. बांगला देशच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश शहाबुद्दीन अहमद यांच्या नेतृत्वाखालील काळजीवाहू सरकार सत्तेवर आले आणि या सरकारने १९९१मध्ये देशात संसदेची निवडणूक जाहीर केली. त्या निवडणुकीत शेख हसीनांच्या अवामी लीगला बेगम खालिदा झियांच्या बीएनपीने धूळ चारली. शेख हसीनांनी तीन मतदारसंघांतून ती निवडणूक लढवली होती. त्यांपैकी दोन ठिकाणी त्यांचा पराभव झाला. शेख हसीनांनी या पराभवाची जबाबदारी स्वीकारत पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा दिला, पण नेते व कार्यकर्त्यांच्या दबावामुळे पुन्हा त्यांनी पक्षप्रमुख पद स्वीकारले. तसेच, शेख हसीना यांनी संसदेत विरोध पक्षनेता म्हणूनही काम पाहण्यास सुरुवात केली.

देशात नव्यानेच सत्तेवर आलेल्या बेगम खालिदा झिया सरकारचे कामकाज तसे ठीकाठाक चालले होते. शेख हसीना आणि त्यांच्या अवामी लीगबरोबरचे बेगम जिया व बीएनपीचे संबंधही बरे म्हणावेत असेच होते. मात्र, १९९४मध्ये झालेल्या मागुरा मतदारसंघातील पोटनिवडणुकीमुळे या दोन्ही पक्षांतील व नेत्यांतील संबंध कायमचेच बिघडले. बांगला देशच्या राजकारणाला वेगळे वळण देणारी पोटनिवडणूक म्हणून या घटनेकडे पाहिले जाते. मागुराच्या अवामी लीगच्या खासदारामुळे ही पोटनिवडणूक घ्यावी लागली. त्यात अवामी लीगच पुन्हा विजयी होईल, असे मानल जात होते. तथापि, बीएनपीने या जागेवर विजय मिळवत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. बीएनपीने गैरमार्गांनी ही पोटनिवडणूक जिंकल्याचा आरोप अवामी लीगने केला आणि या पोटनिवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या तटस्थ निरीक्षकांनीह त्यास दुजोरा दिला. बीएनपीने हे आरोप फ `टाळले, तरी या घटनेमुळे बेगम झिया व शेख हसीना यांच्यातील संबंध बिघडले ते कायमचेच.

बांगला देशात १९९६मध्ये पुन्हा संसदेची निवडणूक होऊ घातली होती. तटस्थ काळजीवाहू सरकारच्या देखरेखीखाली ही निवडणूक घेतली जावी आणि देशाच्या घटनेत त्यासाठी दुरुस्ती केली जावी, अशी मागणी अवामी लीगने केली आणि देशातील अन्य विरोधी पक्षांनीही या मागणीला पाठिंबा दिला. मात्र, सत्तारूढ बीएनपीने ही मागणी साफ फेटाळून लावली. अवामी लीग व अन्य विरोधी पक्षांनी याच मुद्द्यावर देशात रान पेटवण्यास प्रारंभ केला. विरोधकांनी देशभरात संपाचे हत्यार उगारले. ठिकठिकाणी सरकारचा निषेध करणारे मोर्चे निघू लागले. त्यामुळे बीएनपी संकटात आली. विरोधकांच्या या संपामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला फटका



बसत असल्याचे बीएनपीचे म्हणणे होते. मात्र, बीएनपी सरकारने आपली मागणी मान्य करावी, असा आग्रह विरोधकांनी धरला. याच मागणीसाठी १९९५च्या शेवटी संसदेतील सर्व विरोधकांनी राजीनामेही दिले. मात्र, १९९६च्या प्रारंभीच बीएनपी सरकारचा कार्यकाळ संपुष्टात येत असल्याने १५ फेब्रुवारी १९९६ रोजी संसदेची निवडणूक घेण्याची घोषणा बेगम झिया सरकारने केली. या निवडणुकीवर सर्वच विरोधकांनी बहिष्कार घातला. ही निवडणूक हा निव्वळ फार्स असल्याची टीका शेख हसिना यांनी केली. फेब्रुवारीत झालेल्या निवडणुकीत बीएनपीचे सरकारच पुन्हा सत्तेवर आले., पण यावेळी या सरकारने तटस्थ काळजीवाहू सरकारच्या स्थापनेबाबतची तरतूद घटनेत केली. त्यानुसार मुख्य न्यायाधीश महंमद हबिबूर रहमान यांच्या नेतृत्वाखालील काळजीवाहू सरकारच्या देखरेखीखाली ३० जून १९९६ रोजी बांगला देशात पुन्हा संसदेची निवडणूक घेण्यात आली.

या निवडणुकीत शेख हसीना वाजेद यांच्या अवामी लीगला बहुमत मिळून शेख हसीना व त्यांचा पक्ष सत्तेवर आला. आपला कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या शेख हसीना या बांगला देशच्या इतिहासातील पहिल्या पंतप्रधान ठरल्या. बेगम खालिदा झिया यांना सत्तेवर आल्यानंतर फार चमक दाखवता आली नव्हती. त्यांच्या काळात अर्थव्यवस्था जेमतेमच राहिली. शेख हसीना यांनी अर्थव्यवस्था बळकट करण्याबरोबरच शेजारी देशांशी संबंध सुधारण्यावरही भर दिला. बांगला देशाचा सख्खा आणि मोठा शेजारी असलेल्या भारताने १९९१मध्ये खुली अर्थव्यवस्था स्वीकारली होती. त्याचे सकारात्मक परिणामही दिसत होते. शेख हसीना यांनी याच पावलावर पाऊल ठेवत १९९९मध्ये नवे औद्योगिक धोरण जाहीर केले. देशात खासगी उद्योगांना उत्तेजन देण्याबरोबरच रोजगाराच्या संधींत वाढ करण्यावर व त्यातून समृद्धी निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला. त्यासाठी त्यांनी अनेक क्षेत्रांत थेट शंभर टक्के गुंतवणुकीस परवानगी दिली. त्याचा सकारात्मक परिणाम पुढे दिसून आला. बांगला देशातील थेट परकीय गुंतवणुकीत वाढ होऊन उद्योग, व्यवसायातही वाढ होऊ लागली. पुढील काळात बांगला देशाच्या अर्थव्यवस्थेला यातून बळकटी आली.

शेख हसीना यांनी भारताबरोबरच संबंध सुधारण्यासही प्राधान्य दिले. त्याचाच एक भाग म्हणून गंगेच्या पाणीवाटपाबाबतचा ३० वर्षांसाठीचा करार त्यांनी केला. बंगालच्या उपसागराचे सान्निध्य लाभलेल्या देशांच्या (बिमस्टेक) संघटनेत सहभागी होण्याचा निर्णयही त्यांनी घेतला. त्यामुळे भारतासह अन्य शेजारी देशांशी असलेल्या बांगला देशच्या संबंधांतही झपाट्याने सुधारणा झाली. शेख मुजीबूर रहमान यांच्या मारेकऱ्यांना संरक्षण देणारा कायदा आदीच्या लष्करी राजवटीने केला होता. तो हसीना सरकारने रद्दबातल केला.

हसीना सरकारची ही कामगिरी एरवी प्रभावी वाटली, तरी २००१मध्ये झालेल्या निवडणुकीत तिचा कोणताही लाभ शेख हसीना व त्यांच्या अवामी लीगला झाला नाही. त्या निवडणुकीत बीएनपीला ४१ टक्के, तर अवामी लीगला ४० टक्के मते मिळाली. पण यातील गंमत अशी, की जवळपास बीएनपीएवढ्याच टक्क्यांनी मते मिळवणाऱ्या अवामी लीगचे फक्त ६२ उमेदवार त्या निवडणुकीत निवडून आले, तर बीएनपीने २३४ जागा जिंकत पुन्हा सरकार स्थापन केले. या निवडणुकीतही शेख हसीना तीन मतदारसंघातून उभ्या होत्या. पती एम. ए. वाजेद यांच्या जन्मगावाचा समावेश असलेल्या रंगपूर मतदारसंघात त्यांना दारुण पराभवास सामोरे जावे लागले, तर उर्वरित दोन मतदारसंघांतून त्यांनी सहज विजय मिळवला. बीएनपीने काळजीवाहू सरकारच्या मदतीने गैरप्रकार करून ही निवडणूक जिंकल्याचा आरोप शेख हसीनांनी केला, खरा, पण बीएनपीने हा आरोप फेटाळून लावलाच; शिवाय या निवडणुकीत तटस्थ निरीक्षक म्हणून सहभागी झालेल्या देशांनीही या आरोपांत तथ्य नसल्याचे स्पष्ट केले. बेगम खालिदा झिया यांनी पुन्हा एकदा पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली. २००१ ते २००८ या काळात शेख हसीना यांना संसदेत विरोधी पक्षनेत्या म्हणून काम करावे लागले. अवामी लीगने २००३ मध्ये खालिदा झिया यांच्या सरकारच्या विरोधात रान पेटवण्यास प्रारंभ केला. तसेच, ३० एप्रिल २००४ पूर्वी झिया सरकार कोसळेल, असा प्रचारही केला. तथापि, तसे काही घडले नाही. त्यामुळे शेख हसीना व त्यांच्या अवामी लीग पक्षाचे हसे झाले. तो सर्व काळ बांगला देशासाठी कठीण होता. राजकीय अस्थैर्य, अराजकता यांमुळे जनजीवन दूषित बनले होते. अवामी लीग पक्षाचे खासदार अशानुल्ला खान यांची याच काळात हत्या झाली आणि वातावरण तापत गेले. २१ ऑगस्ट २००४ रोजी ढाक्यात अवामी लीगच्या मेळाव्यावरच बॉंबहल्ला झाला. त्यात अवामी लीगचे २१ कार्यकर्ते मारले गेले. पक्षाच्या महिला शाखेच्या चिटणीस ई. व्ही. रहमान शेख यांचाही त्यात समावेश होता. अवामी लीगचे नेते व माजी अर्थमंत्री एम. एस. किब्रिया यांचाही सिल्हेट जिल्ह्यात झालेल्या हल्ल्यात मृत्यू झाला. चित्तगावमध्ये २००५मध्ये महापौरपदाची निवडणूक जाहीर झाली. बांगला देशातील हे दुसरे मोठे शहर. राजकीयदृष्ट्याही ते महत्त्वाचे आहे. त्या निवडणुकीत अवामी लीग व बीएनपी आमनेसामने आले. त्यात अवामी लीगचे ए. बी. एम. मोहिउद्दीन चौधरी यांनी बाजी मारली. देशातील राजकीय वातावरण बदलत असल्याची ही चुणूक असल्याचे मानले जाऊ लागले.

खालिदा झिया सरकारचा कार्यकाळ २००६च्या ऑक्टोबरमध्ये संपुष्टात आला आणि काळजीवाहू सरकारच्या स्थापनेची गडबड

सुरू झाली. यावेळी देशात पुन्हा हिंसाचाराचा आगडोंब उसळला. परिस्थिती इतकी टोकाला गेली, की लाजुद्दीन अहमद यांनी देशात आणीबाणी लागू केली. लेफ्टनंट जनरल मोईउद्दीन अहमद यांनी सत्तासूत्रे हाती घेतली. शेख हसीना यांना पोलिसांनी १६ जुलै २००६ रोजी अटक केली. त्यांच्याविरुद्ध खंडणी आणि हिंसाचाराचे आरोप ठेवले गेले. संसदेच्या आवारातील एका इमारतीतच त्यांना बंदिवासात ठेवले गेले. अवामी लीगने या अटकेवर रान पेटवण्यास प्रारंभ केला असतानाच भ्रष्टाचारविरोधी राष्ट्रीय आयोगाने शेख हसीना व खालिदा झिया या दोन्ही नेत्यांना नोटिसा बजावत आठवडाभरात आपल्या संपत्तीची माहिती देण्याचे आदेश दिले. शेख हसीनांचे पुत्र साजिद वाजिद जॉय या काळात विदेशात होते. त्यांनीही विदेशात राहूनच आईच्या सुटकेसाठी प्रयत्न सुरू केले. बांगला देशच्या सर्वोच्च न्यायालयाने शेख हसीना यांना जामीन मंजूर केला. त्यानंतर वैद्यकीय उपचारांसाठी त्या अमेरिकेस गेल्या.

बांगला देशात २००८ च्या नोव्हेंबरमध्ये संसदेची निवडणूक घोषित झाली आणि शेख हसीना पुन्हा बांगला देशात परतल्या. त्यांनी या निवडणुकीसाठी हुसेन महंमद ईर्शाद यांच्या जातीय पार्टीशी युती केली. याशिवाय देशातील अन्य छोट्या १३ पक्षांशीही त्यांनी युती केली. तसेच, डिसेंबरच्या प्रारंभीच या महाआघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. २०११पर्यंत डिजिटल बांगला देशची घोषणा त्यांनी यात केली. या महाआघाडीने २९९ पैकी २३० जागा मिळवत पूर्ण बहुमत मिळवले. खालिदा झिया यांनी या निकालांवर आक्षेप घेतले खरे, पण ते टिकले नाहीत. सहा जानेवारी २००९ रोजी शेख हसीना यांनी दुसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. काळजीवाहू सरकारच्या काळातील निर्णयांना पाठिंबा देणाऱ्या अवामी लीगच्या अनेक नेत्यांना शेख हसीनांनी सरळ घरी बसवले. मात्र, २००९ मध्येच बांगला देश रायफलमध्ये बंडाचे वारे वाहिल्याने शेख हसीनांना मोठा धक्का बसला. हे बंड त्यांनी यशस्वीरीत्या शमवले. देशाची आर्थिक घडी बसवण्यासाठीच त्या सातत्याने प्रयत्नशील राहिल्या. शेजारच्या म्यानमारमधील रोहिंग्यांची समस्या गंभीर बनत होती आणि या रोहिग्यांचे जथ्थेच्या जथ्थे बांगला देशाकडे सरकू लागले होते. या स्थलांतरितांना कोणत्याही परिस्थितीत बांगला देशात येऊ दिले जाणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली आणि त्यावर त्या कायमही राहिल्या.

बांगला देशात २०१४मध्ये झालेल्या निवडणुकीतही अवामी लीगने बाजी मारली. त्यामुळे शेख हसीनांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. पंतप्रधानपदाच्या या काळात त्यांनी भारताबरोबर गंगा पाणीवाटप करार केला. देशाच्या संरक्षणविषयक गरजांकडे अधिक लक्ष दिले. तसेच, आर्थिक आघाडीवर त्यांनी अधिक धाडसी निर्णय घेतले. विशेषत: देशातील थेट परकीय गुंतवणुकीचे प्रमाण वाढवण्याबरोबरच ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीसाठी लघू उद्योगांना चालना देण्याबरोबरच महिलांना रोजगाराच्या संधी देणारी धोरणे स्वीकारली. जागतिक पातळीवर त्यांच्या या निर्णयांचे कौतुकच झाले. तथापि, पंतप्रधानपदाच्या या तिसऱ्या कारकिर्दीत पद्मा नदीवरील पुलाच्या निर्मितीत झालेल्या गैरव्यवहाराचे प्रकरण, हॉलमार्क सोनाली बँक गैरव्यवहार प्रकरण, शेअर बाजारातील गैरव्यवहाराचे प्रकरण, राणा प्लाझातील गोळीबार व या प्लाझाची झालेली पडझड, अशी एकापाठोपाठ एक प्रकरणे गाजली आणि त्यामुळे शेख हसीना अडचणीतही आल्या. तथापि, अद्यापही त्यांची बांगला देशच्या राजकारणावरील पकड सुटलेली नाही. बांगला देशात पुढील वर्षी पुन्हा निवडणूक होऊ घातली असून, त्यासाठीही त्यांनी पुन्हा तयारी सुरू केली आहे. बेगम खालिदा झिया व शेख हसीना यांच्यातील संघर्षाचे दर्शन त्याही वेळी घडेल. दोन बेगमांमधील हा संघर्ष आता कोणत्या वळणावर जातो, हे पाहणे अगत्याचे ठरेल. मात्र, सध्या तरी शेख हसीना यांनी सत्तासूत्रे खंबीरपणे हाती ठेवली आहेत. भारताबरोबरचे संबंध अधिक दृढ करण्याबरोबरच बांगला देशच्या अर्थव्यवस्थेला अधिक चालना देण्यासाठी बांगला देशची ही वाघीण आजही प्रयत्नशील आहे.

## साद-प्रतिसाद

**प्रिय वाचक,**
**साद अंकाविषयी आपल्या प्रतिक्रियांची आम्ही वाट पाहत आहोत. त्याच बरोबर आपल्या समस्यांविषयी मार्गदर्शन हवे असल्यास आपण 'साद'शी संपर्क साधू शकता. आपल्या समस्या खालील मेलवर लिहून पाठवा.**
**saad.mscw@gmail.com**

रौप्य महोत्सवी वर्ष २०१८
// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई**
गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ - २६५९०८७८
mscwmahilaayog@gmail.com

'रूपे'री पडद्यावर...



# बाईच्या फँटसीची 'फँटॅस्टिक' गोष्ट...

गेल्या काही वर्षांत महिलाप्रधान चित्रपटांची संख्या हिंदी चित्रपटसृष्टीत वाढते आहे. महिलांच्या प्रश्नांकडे, समस्यांकडे संवेदनशीलतेनं पाहणारी एक नवी फळी चित्रपटसृष्टीत तयार झाली आहे. या चित्रपटांमुळं महिलांकडं पारंपरिक नजरेनं पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोनही बदलत आहे. हा हळूहळू घडणारा बदलही आश्वासक आहे. अशा काही चित्रपटांचा परिचय या सदरातून आपण करू घेऊ या. या वेळचा चित्रपट आहे 'लिपस्टिक अंडर माय बुरखा'..

## अनिरुद्ध नगरकर

फँटसी ही गोष्टच अद्भुत... दुसऱ्या दुनियेत नेणारी... त्यात ती बाईची फँटसी असेल तर... आणि त्यातही ती तिच्या लैंगिकतेची फँटसी असेल तर..? या 'फँटसी'ची आपण कल्पनाही कदाचित करू शकणार नाही. पण जिथं कदाचित कल्पनाही पोचू शकत नाही, अशा अज्ञात जागांची सफर करणं हे तर कलाकारांचं काम असतं. त्यातूनच कलाकृती जन्माला येतात आणि आपल्याला विचार करायला भाग पाडतात... 'लिपस्टिक अंडर माय बुरखा' ही अशीच एक कलाकृती आहे. वरकरणी 'ब्लॅक' कॉमेडीचा 'बुरखा' (**Pun Intended**) पांघरलेली, पण आतून खूप काही तरी निराळं सांगणारी ही एक फँटसीची फँटास्टिक गोष्ट आहे. दिग्दर्शिका अलंकृता श्रीवास्तवनं ही आगळीवेगळी 'लिपस्टिक' आपल्यासमोर अशा काही तडफेनं सादर केलीय, की बस्स!

माणसाची लैंगिक प्रेरणा ही आदिम गोष्ट... पण आज २०१८ मध्येही आपण त्याविषयी नीट बोलत नाही. आपल्या दांभिक मानसिकतेचा हा क्लासिक नमुना आहे. आपली लैंगिकता किंवा ती भावना ही आपल्या हगण्या-मुतण्याइतकीच नैसर्गिक गोष्ट; पण वर्षानुवर्षं गोपनीयतेच्या बुरख्यात दडवली गेली. त्यातही बाईच्या लैंगिकतेविषयी बोलायचं तर अब्रह्मण्यम! आणि त्यातही तिनं स्वतःच बोलायचं म्हणजे तर अबबच!

अशा वेळी मग अलंकृता आपल्याला भोपाळच्या चार बायकांची गोष्ट सांगते. ही गोष्ट आहे या बायकांच्या लैंगिक प्रेरणांची, त्याच्या दमनाची,

उद्वेगाची आणि उद्रेकाचीही! यातल्या दोन जणी मुस्लिम आहेत हा योगायोग. पण गोष्टीसाठी महत्त्वाचा... आणि मुस्लिम म्हणून त्या बायकांच्या होणाऱ्या जास्तीच्या कोंडीचं एक वेगळं परिमाण या गोष्टीला लाभतंच. उषा परमार ऊर्फ बुवाजी ऊर्फ 'रोझी' (रत्ना पाठक-शाह), शिरीन (कोंकणा सेन-शर्मा), रेहाना (प्लबिता बोरठाकूर) आणि लीला (आहना कुमरा) या चार वेगळ्या वयोगटातल्या, वेगळ्या परिस्थितीतल्या बायका... त्यांच्यातला समान धागा एकच... सध्या त्या जे जगताहेत त्यात त्यांना समाधान नाही.

बुवाजी ५५ वर्षांच्या आहेत आणि त्यांच्या आजूबाजूच्या लोकांसाठी त्या (पती निधन झालेलं असल्यानं) एक देवधर्म करणाऱ्या ज्येष्ठ महिला आहेत. असं असलं, तरी बुवाजींच्या आतली (कदाचित कित्येक वर्षं उपाशी राहिलेली) स्त्री अजून जिवंत आहे. ती आतून वेळी-अवेळी धडका देत असते. मग देवधर्माच्या पुस्तकांच्या मध्ये 'त्या' रंगीत कादंबऱ्या वाचून बुवाजी आपल्या इच्छांची अर्धीमुर्धी पूर्ती करीत असतात. अशाच एका कादंबरीची नायिका असते 'रोझी'. बुवाजी 'रोझी' वाचत जातात आणि ही गोष्टच या सिनेमाचंही निवेदन बनते. एकदा काही कारणाने बुवाजींची गाठ एका स्विमिंग ट्रेनर तरुणाशी पडते. त्या तरुणाचा कमावलेला घाटदार देह बुवाजींच्या मनातल्या दबलेल्या भावनांवर अलगद फुंकर घालतो.

रेहाना टिपिकल मुस्लिम घरातली कॉलेजवयीन मुलगी आहे. तिला इंग्लिश गाणी पाठ आहेत आणि स्पर्धेसाठी ऑडिशन द्यायचीय. एरवी सक्तीनं बुरखा वापरावा लागणारी रेहाना कॉलेजमधील 'जीन्स हटाव'विरोधी मोर्चात उत्साहानं सामील होते. तिला हव्या त्या वस्तू मिळविण्यासाठी मॉलमध्ये चोरी करायची सवय लागते. रेहानाचं एका हिंदू मुलावर प्रेम आहे. हा मुलगा तिच्याच मैत्रिणीचा बॉयफ्रेंड आहे.

लीलाचं अर्शद नावाच्या एका मुस्लिम फोटोग्राफरवर प्रेम आहे. पण तिच्या घरचे तिच्या मनाविरुद्ध तिचं लग्न एका दुसऱ्या तरुणाबरोबर ठरवत आहेत. लीला ब्यूटिशियन आहे आणि तिला या छोट्या शहराचा कंटाळा आलाय. लीलाची कामभावनाही जरा जोरकस आहे.

शिरीन चोरून सेल्सचं काम करते आहे. तिला तीन मुलं आहेत आणि नवरा सौदीतील नोकरी सोडून परत आलाय. शिरीनच्या नवऱ्याचं दुसऱ्या एका बाईसोबत अफेअर चालू आहे. लैंगिक संबंधांबाबत तो इतर सनातनी भारतीय पुरुषांसारखाच आहे. त्याला काही झालं तरी कंडोम वापरायचा नाहीय आणि बायकोचे तीन गर्भपात झाले तरी त्याला फिकीर नाहीय. लैंगिक संबंध ही दोन व्यक्तींचा सहभाग असलेली क्रिया असते आणि त्यात समोरच्या व्यक्तीलाही काही 'से' असू शकतो, ही गोष्ट त्याच्या आकलनापलीकडची आहे. (त्याचे आणि शिरीनचे संबंध पाहताना प्रेक्षक म्हणून आपल्यालाच शिसारी येते, तर शिरीनचं काय होत असेल?) शिरीनला या सगळ्याचा वीट आलाय आणि तिला सेल्स ट्रेनर म्हणून आलेली ऑफर नवऱ्याची पर्वा न करता स्वीकारायची आहे.

या चारही मुली/बायका बुवाजीच्या हवेलीत राहत असतात. जुन्या आणि नव्या भोपाळच्या नेपथ्यावर ही गोष्ट घडताना पाहणं फारच अर्थपूर्ण आहे. तिथल्या जुन्या गल्ल्यांप्रमाणे आपल्या रुढी-परंपरांची वस्ती या बायकांच्या अवतीभवती एखाद्या नागासारखी वेटोळं घालून आहे. नव्या भोपाळमध्ये मॉल आहेत. चकाचक सौंदर्यप्रसाधनं विकली जातायत. बुवाजीला स्विमिंग शिकायला जाताना नवा स्विम सूट घ्यायचा आहे तर या मॉलमध्येच जावं लागतं. तिथल्या सरकत्या जिन्यावरून वर जाताना ती अडखळते. तेव्हा छोट्या मुस्लिम मुलींचा एक घोळका सराइतपणे त्या सरकत्या जिन्यावरून वर जातो आणि त्यातली शेवटची मुलगी नकळतपणे बुवाजीचा हात धरून तिला वर नेते, हा फार सुंदर शॉट यात आहे. बुवाजी नंतर 'रोझी' बनून स्विमिंग ट्रेनर जसपालशी बोलू लागते. नंतर तर हा फोन हीच तिच्या आयुष्यातली मोठी फँटसी बनून जाते.





बुवाजी आणि जसपाल फोनवरून शृंगारिक बोलत असतानाचं एक अप्रतिम दृश्य यात आहे. यात रत्ना पाठक शाहनं केलेला अभिनय जबरदस्त. कित्येक वर्षं लैंगिक भूक न भागलेल्या स्त्रीच्या सर्व भावभावना तिनं केवळ चेहऱ्यावरून व्यक्त केल्या आहेत.

कोंकणा सेनशर्माची शिरीनही अशीच जबरदस्त! लीला




तिचं वॅक्सिंग करत असतानाचा शॉट व तेव्हाचे दोघींचे संवाद भारी आहेत. पती जवळपास रोज जबरदस्ती करीत असताना, तीन मुलांना वाढवताना, वेगवेगळ्या घरी घुसून वस्तू विकताना शिरीननं 'सेन्स ऑफ ह्यूमर' जपला आहे आणि तो कोंकणानं फार छान दाखवला आहे. ती अभिनेत्री म्हणून ग्रेट आहेच. पण शिरीन साकारताना कोंकणानं खूपच मोठी मजल मारली आहे, असं म्हणावंसं वाटतं. ती पहिल्यांदा ज्या बाईच्या घरी घुसते तेव्हाचा प्रसंग, नंतर नवऱ्याला दुसऱ्या बाईसोबत एका रेस्टॉरंटमध्ये पाहते तो प्रसंग आणि नंतर त्या बाईच्या घरी जाऊन 'मेरी मुँह की चीज तुम क्यूं इस्तेमाल करोगी?' म्हणतानाचा तिचा ॲटिट्यूड... इतर सगळं काही खल्लास करून टाकते ती!

लीला झालेल्या आहना कुमरानंही तिची तडफड फार प्रभावीपणे दाखविली आहे. काही स्त्रियांचा 'सेक्स ड्राइव्ह' खूपच जास्त असतो. लीला अशांपैकी एक. तिचं प्रेमप्रकरण कुणी समजून घ्यायला तयार नाही, तर ही भावना समजून घेणं दूरच. एरवी संधी मिळेल तिथं तिला 'घेणारा' तिचा मित्रही शेवटी तिच्या या पवित्र्यापुढं वैतागतो. मग होणाऱ्या नवऱ्यासोबत लीलाला ते हवं असताना तो हनीमूनची वाट पाहायला सांगतो, तेव्हा लीलाला त्याला काय सांगावं, हे उमगत नाही.

रेहाना वयानं अद्याप लहान आहे. पण तिला आपल्याला काय आवडतं, काय हवं हे नक्की माहिती आहे. मॉलमधून लिपस्टिकपासून ते शूजपर्यंत अनेक वस्तू चोरून नेताना तिच्या मनातल्या अभिलाषेनं तिच्या सारासार विवेकबुद्धीवर मात केल्याचं आपल्याला स्पष्ट दिसतंय. रेहानासारख्या अनेक मुली आज मध्यम आकाराच्या शहरांमध्ये अस्वस्थपणे आपल्याला हवा तो आनंद शोधण्यासाठी तडफड करीत आहेत.

या चारही स्त्रिया शेवटी एका मेळ्याच्या निमित्तानं एकत्र येतात. प्रत्येकीच्या गोष्टीचा (बहुतांश लॉजिकल) शेवट होतो. आपण तो शेवट गृहीतच धरलेला असतो. पण आपल्या अपेक्षेपेक्षा या बायका अधिक समजूतदार निघतात. 'रोझी' शेवटी स्वप्नातच भेटणार, हे प्रत्येकीला उमगतं... पण तरीही आपल्या इच्छा मारायच्या नाहीत, आपण स्वप्नं पाहायचं सोडायचं नाही, असा दिलासा त्या एकमेकींना देतात.

अलंकृता श्रीवास्तव हिचा हा पहिलाच सिनेमा. अनेक अडचणींनंतर तो पडदा पाहतो आहे. सिनेमाचं 'मधलं बोट'रूपी लिपस्टिक दाखवणारं पोस्टरही अर्थपूर्ण आहे. स्त्रीच्या लैंगिकतेविषयी आणि मुळातच एक व्यक्ती म्हणून स्त्रीच्या भावभावनांविषयी आपण जरा अधिक संवेदनशील झालो, तर या सिनेमाचं सार्थक होईल.

मग एकदम विचार आला, या सिनेमाविषयी आपण विचार करतोय तोही एका पुरुषाच्या अँगलनं... मुळात तिचं तिला ठरवू देत काय ते... हे चूक हे बरोबर हे सांगणारे आपण कोण?

या भावनांचं दमन होतंय, त्या भावनांचा उद्रेक होतोय, तमक्या भावनांना वाट मिळाली पाहिजे... हे सांगणारा मी कोण?

हा विचार मनात आला आणि मी 'ऑफ'च झालो...

# समलिंगी संबंध गुन्हा नाही



## सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

**नवी दिल्ली :** समलैंगिक संबंध आता यापुढे गुन्हा नाही, असा ऐतिहासिक निकाल सुप्रीम कोर्टाने नुकताच दिला आहे. या संबंधांना गुन्हा ठरविणारी तरतूद असलेले भारतीय दंड संहितेतील कलम ३७७ दीडशे वर्षांपूर्वीचे आहे. या तरतुदीमुळे व्यक्तिस्वातंत्र्यांच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन होत असल्याचे निरीक्षणही सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले.

सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने हा निर्णय दिला आहे. समलैंगिक संबंधांच्या हक्कासाठी काम करणाऱ्या संघटनांचे अनेक वर्षांच्या प्रयत्नांना त्यामुळे यश आले आहे.

यापूर्वी २०१३ साली दिल्ली उच्च न्यायालयाने समलैंगिक संबंधांना परवानगी दिली होती, पण त्यानंतर या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाने आधी समलैंगिक संबंधांच्या विरोधात निकाल दिला. त्यानंतर फेरविचार याचिका दाखल करण्यात आली होती.

याआधी केंद्र सरकारने सम लैंगिक संबंधांच्या विरोधात भूमिका घेतली होती. पण यावेळी केंद्र सरकारने कोर्टात तटस्थ भूमिका घेतली आणि समलैंगिक संबंधांना मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा करून दिला.

सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठात सरन्यायाधीश दीपक मिश्रा, न्यायमूर्ती रोहिंग्टन नरिमन, ए. एम. खानविलकर, डी. वाय. चंद्रचूड, इंदू मल्होत्रा यांचा समावेश आहे. घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांमध्ये जीविताच्या अधिकाराचा समावेश आहे. त्यामध्ये लैंगिक स्वातंत्र्याचा समावेश होतो का याचे परीक्षण या पीठाने केलं. यापूर्वी नऊ न्यायमूर्तींच्या पीठाने खासगीपणाचा अधिकार हा मूलभूत अधिकार निर्णय दिला आहे, असा निर्णय दिला होता. त्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो.

### कलम ३७७ काय सांगते?

जी व्यक्ती पुरुष, महिला किंवा प्राण्याशी अनैसर्गिक शरीरसंबंध ठेवेल त्याला तुरुंगवासाची शिक्षा होईल. तुरुंगवासाची ही शिक्षा १० वर्षांपर्यंत वाढू शकेल, तसंच दंडालाही पात्र ठरेल.

हा कायदा १५० वर्षांपासून अस्तित्वात आहे. ब्रिटिशकालीन व्हिक्टोरियन नैतिकतेचं प्रतीक म्हणून या कायद्याकडं पाहिलं जातं.

या कायद्याचा फटका गे (सम लैंगिक पुरुष), लेस्बियन (समलैंगिक स्त्रिया), बायसेक्शुअल (उभयलिंगी पुरुष आणि स्त्रिया) आणि ट्रान्सजेंडर्स यांना बसला. या सगळ्यांना एकत्र डञ्हृढ असं म्हटलं जातं. ऑक्टबर

### निकालपत्रातील महत्त्वाचे मुद्दे

• लैंगिकता ही वैयक्तिक निवड असून हा मूलभूत अधिकार आहे. लोकांच्या वैयक्तिक निवडीच्या स्वातंत्र्याचा आदर करायला हवा. • एलजीबीटी व्यक्तींचे मूलभूत हक्क इतर व्यक्तींप्रमाणे आहेत. • स्वतःच्या अभिव्यक्तीची गळचेपी म्हणजे मृत्यू होय. • कलम ३७७च्या माध्यमातून सम लैंगिक सेक्सला विरोध करणं अतार्किक, असंवैधानिक आणि मनमानी होतं. • समाजातील मोठा घटक बहिष्कृत आयुष्य जगत आहे, हे वास्तव आहे. • जोपर्यंत समाजातील सर्व घटकांना बंधनातून मुक्त आयुष्य जगता येणार नाही, तोवर आपण स्वतंत्र समाज ठरू शकत नाही. • ज्यांना समान हक्क मिळाले नाहीयेत, त्यांना ते देणं कर्तव्य आहे. • समाजातील पूर्वग्रह दूर करण्याची वेळ आली आहे. • घटनेच्या तीन स्तंभांची जबाबदारी आहे की बहुसंख्याकवादाला विरोध करायला हवा आणि घटनात्मक नैतिकता प्रस्थापित करायला हवी. • घटनात्मक नैतिकता आणि लोकप्रिय मतप्रवाह यांच्यात गल्लत होऊ नये. • आपण आपल्यातल्या वैविध्याचा आदर करायला हवा. • आपण एकमेकांप्रति सहिष्णू व्हायला हवं. इतरांनी आपल्याप्रमाणेच असावं, असा आग्रह धरणे चुकीचे. • प्रत्येक ढगात इंद्रधनूचे रंग शोधूया आणि मुखवट्यांशिवाय आयुष्य जगूया.

२०१७च्या आकडेवारीनुसार एलजीबीटी संबंधांना २५ देशांत कायदेशीर मान्यता आहे.

या देशांत नेदरलँड्स, बेल्जियम, कॅनडा, स्पेन, दक्षिण आफ्रिका, नॉर्वे, स्वीडन, मेक्सिको, आईसलंड, पोर्तुगाल, अर्जेंटिना, डेन्मार्क, उरुग्वे, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, ब्राझील, ब्रिटन, लक्झेम्बर्ग, अमेरिका, फिनलंड, कोलंबिया, जर्मनी, माल्टा यांचा समावेश आहे.

## गे-सेक्सला कोणाचा विरोध आणि का?

दिल्ली बालहक्क संरक्षण समिती, अपोस्टोलिक चर्चेस अलायन्स आणि इतर दोन ख्रिश्चन संस्थांनी गे सेक्स कायदेशीर करायला विरोध केला आहे. ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डाचा याला आधी विरोध होता पण आता त्यांनी या मुद्द्यावर तटस्थ भूमिका घेतली आहे. मुस्लीम बोर्डाने याबाबतचा निर्णय कोर्टावर सोडला आहे.

विरोधकांचं म्हणणं आहे की जरी दोन प्रौढांच्या परस्पर संमतीने असे संबंध प्रस्थापित होत असतील आणि तो त्या प्रौढांचा खाजगीपणाचा हक्क असेल तरीही नैतिकता, शालीनता आणि आरोग्याच्या मुद्द्यांवर खाजगीपणाच्या हक्कावर मर्यादा आणता येऊ शकतात. गे-सेक्सच्या विरोधात बोलणाऱ्यांचं म्हणणं आहे की जगात ७६ देश अजूनही अशा प्रकारच्या संबंधांना गुन्ह्याचा दर्जा देतात हे लक्षात घेतलं पाहिजे.

कुराण, बायबल, अर्थशास्त्र आणि मनुस्मृतीसारख्या धर्मग्रंथांमध्ये समलैंगिक संबंधांना पाप ठरवलं आहे. कोणत्याही कायद्यात सामजिक नैतिकता महत्त्वाची भूमिका बजावते. कोणतेही गुन्हेसदृश्य कृत्य फक्त त्यात सहभागी होणाऱ्या व्यक्तींची त्या कृत्यासाठी संमती आहे या कारणावरून कायदेशीर करता येणार नाही. खरंतर भारत सरकारने याविषयी ठाम भूमिका घेऊन कलम ३७७ मधल्या सगळ्या तरतूदींचा बचाव करणं गरजेचं होतं. पण सरकारने मात्र या संदर्भात आपली भूमिका वारंवार बदलली आहे. दिल्ली हायकोर्टातल्या सुनावणी दरम्यान जेव्हा कलम ३७७ च्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उभं राहिलं होतं, तेव्हा तत्कालीन यूपीए सरकारने कलम ३७७चा ठामपणे बचाव केला होता. पण दिल्ली हायकोर्टाने सरकारच्या विरोधात निर्णय देऊन हे कलम रद्द केलं होतं.

पण जेव्हा सुप्रीम कोर्टात केस उभी राहिली तेव्हा सरकारने आपला पवित्रा बदलला. सुरुवातीला सरकारी वकीलांनी सांगितलं की सरकार अजूनही या कलमाच्या वैधतेच्या बाजूने आहे आणि त्यांनी दिल्ली हायकोर्टात जो पवित्रा घेतला होता तो कायम आहे. पण दुसऱ्याच दिवशी, पी चिदंबरम, विरप्पा मोईली, गुलाम नबी आझाद यांच्यासारख्या जेष्ठ नेत्यांच्या हस्तक्षेपामुळे अटर्नी जनरल गुलाम वहाणवटी यांनी कोर्टात सांगितलं की सरकारने हा निर्णय आता कोर्टावर सोडला आहे. सरकारच्या तटस्थ भूमिकेनंतरही सुप्रीम कोर्टाने हे कलम वैध ठरवले. खटल्याच्या दुसऱ्या फेरीत केंद्र सरकारने आपली तटस्थ भूमिका कायम ठेवली आणि 'आम्ही हा निर्णय कोर्टावर सोडतो,' असं प्रतिपादन केलं. पण सरकारने योग्य ते प्रतिज्ञापत्र सादर न केल्याने गोंधळ उडाला.

आरोग्य मंत्रालयाने ७० पानांचे प्रतिज्ञापत्र सादर केले होते ज्यात म्हटले होते की, जर समलैंगिक संबंधाना संमती दिली तर एड्स सारखे रोग तर पसरतीलच पण त्याबरोबरच लोक मानसिक रोगांनाही बळी पडतील. समलैंगिक संबंधांमुळे समाजात अनारोग्य पसरेल तसंच सम ाजात नैतिक मुल्यांचीही घसरण होईल. समलैंगिक संबंधांना निसर्गाचं अधिष्ठान नाही कारण त्यामुळे वंशवाढ होऊ शकत नाही. जर सगळेच समलैंगिक झाले तर मानवी वंश खुंटेल.

समलैंगिक संबंध अनेक वाईट प्रवृत्तींना आमंत्रण देतात. हे समाजाच्या विरूद्ध असून, अश्लील, किळसवाणे आणि अत्यंत चुकीचे आहेत.

मात्र गृह मंत्रालयाने हे प्रतिज्ञापत्र ऐनवेळी नाकारलं आणि चार पानांचं एक वेगळंच प्रतिज्ञापत्र सादर केलं. हे प्रतिज्ञापत्र भाजपच्या जाहीरनाम्याशी मिळतंजुळतं होतं. २०१४ साली भाजपने जाहीर



केलेल्या जाहीरनाम्यात समलैंगिकतेला गुन्हा ठरवणारा कायदा बदलला जाईल असे संकेत दिले होते.

न्यायालयात कितीही वाद प्रतिवाद झाले तरी खाजगीपणाचा हक्क ठरवण्याची प्रक्रिया ही त्या त्या केसवर अवलंबून असेल. त्यामुळे वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क, भारतभरात कुठेही स्वतंत्रपणे फिरण्याचा हक्क, तसंच भाषणस्वातंत्र्याच्या हक्कासारखाच खाजगीपणाचा हक्क मुलभुत हक्क आहे की नाही हे ठरवणं कोर्टाच्या हातात आहे.

हे ठरवताना कोर्टाला आधुनिक जगण्यातल्या बदलणाऱ्या मूल्यांचाही विचार करावा लागेल. नव्याने झालेल्या तांत्रिक, वैज्ञानिक, आणि वैद्यकीय प्रगतीमुळे निसर्गाचे नियम काय आहेत आणि काय नाही याविषयीची मतं बदलली आहेत. उदाहरण द्यायचं झालं तर सरोगसी, आयव्हीएफ, तंत्रज्ञान, क्लोनिंग, स्टेम सेल रिसर्च, गर्भनिरोधकांच्या वेगवेगळ्या पद्धती अशी अनेक देता येतील.

**(सौजन्य : बीबीसी मराठी)**

# भाऊसाहेब गोरे, संजय कुऱ्हाडे यांना महिला आयोगाकडून नोटीस

## महिलांविषयी आक्षेपार्ह उद्‌गार काढल्याबद्दल कारवाई

साद प्रतिनिधी

महिलाविषयी आक्षेपार्ह विधाने केल्याबद्दल राज्य महिला आयोगाने जालना येथील मुख्याध्यापक भाईसाहेब गोरे आणि पुण्यातील निगडी येथील संजय कुऱ्हाडे यांनी महिलांविरोधात आक्षेपार्ह विधाने केली होती. राज्य महिला आयोगाने या विधानांची स्वाधिकारे (स्यू मोटो) दखल घेत या दोघांनाही आठ दिवसांत आयोगासमोर समक्ष हजर राहून खुलासा करण्याचा आदेश दिला आहे.

कुऱ्हाडे शिक्षक आहेत. त्यांनी बीडच्या खासदार प्रीतम मुंडे यांच्याविरोधात फेसबुक या समाजमाध्यमावर आक्षेपार्ह मजकूर लिहिला होता. त्यांचे वक्तव्य महिलां लोकप्रतिनिधींचा अपमान करणारे असून, स्त्रियाची प्रतिमा मलिन करणारे आहे. या बाबत कुऱ्हाडे यांनी आठ दिवसांत समक्ष उपस्थित राहून म्हणणे मांडावे, असा आदेश देण्यात आला आहे.

रौप्य महोत्सवी वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

जालना येथील रामनगरच्या शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक भाऊसाहेब गोरे यांनी एका जाहीर कार्यक्रमात महिलांविषयक अश्लील आणि वादग्रस्त विधाने केली होती. भाऊसाहेब गोरे यांच्या या वक्तव्याची महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने स्वाधिकारे दखल घेतली. त्यांनाही ८ दिवसात भाऊसाहेब गोरे यांना खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

भाऊसाहेब गोरे यांनी आपल्या भाषणातून जातीय तेढ निर्माण करणारे वक्तव्य केल्याप्रकरणी याआधीच त्यांच्यावर कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातही पोलिसांकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे याचा सविस्तर अहवाल तत्काळ सादर करण्याचे निर्देश जालन्याच्या पोलिस अधीक्षकांना देण्यात आले आहेत.

---

हेल्पलाइन

# अटकेसंबंधी महिलांचे अधिकार

- महिलांना फक्त महिला पोलिस सूर्योदयानंतर आणि सूर्यास्तापूर्वी अटक करू शकतात.
- कुटुंबाच्या सदस्यांच्या उपस्थितीत व योग्य कारण असेल तरच स्त्रीला पोलिस ठाण्यात चौकशीसाठी बोलावता येते.
- स्त्रीला अटक केल्यास तिला फक्त महिला कक्षामध्येच ठेवता येते.
- महिलांच्या तक्रारीचे स्वरूप असेल तर पोलिस एफआयआर दाखल करतात.
- एफआयआर दाखल केला, तर त्याची प्रत देणे पोलिसांवर बंधनकारक आहे.
- सूर्यास्तानंतर आणि सूर्योदयापूर्वी कुठल्याही महिलेला पोलिस ठाण्यात चौकशीसाठी थांबवून ठेवता येत नाही.




- पोलिस ठाण्यात महिलेची चौकशी सुरू असेल, तर तिथे महिला कॉन्स्टेबल असणे अनिवार्य आहे.
- महिला आरोपीची वैद्यकीय तपासणी महिला डॉक्टर करील किंवा महिला डॉक्टरच्या उपस्थितीत पुरुष डॉक्टर करू शकेल.
- कुठल्याही महिला साक्षीदाराला पोलिस ठाण्यात येण्याची सक्ती करता येणार नाही. गरज भासल्यास पोलिस तिच्या घरी जातील.

# मुले-मुली गुणोत्तरवाढीसाठी आयोगाचे प्रयत्न

## गर्भलिंग निदान रोखण्यासाठी तपासणी समिती करणार दौरा

साद प्रतिनिधी

गर्भलिंग निदान रोखण्यासाठी राज्य तपासणी व सनियंत्रण समिती संपूर्ण राज्याचा दौरा करणार असून, याची सुरुवात मुलींचे लिंगगुणोत्तर कमी असलेल्या बीड, जळगाव अशा जिल्ह्यांपासून होणार आहे. याकरिता तपासणी संच तयार करण्यात येईल, असे समितीच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी सांगितले.

गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियमाची २००३ (पीसीपीएनडीटी) प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने स्थापन केलेल्या राज्य तपासणी व सनियंत्रण समितीची कार्यशाळा तसेच पहिली बैठक मुंबईत नुकतीच पार पडली. त्या वेळी रहाटकर बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.

राज्य तपासणी व सनियंत्रण समितीच्या अध्यक्षा तथा महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस समितीचे सदस्य आमदार प्रा. मेधा कुलकर्णी, आमदार शशिकांत खेडेकर, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या उपसचिव श्रीमती भरोसे, डॉ दिगंबर कानगुले, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, पीसीपीएनडीटी , पुणे, आरोग्य सेवा सहसंचालक डॉ. साधना तायडे, स्त्री मुक्ती संघटनेच्या वृषाली मगदूम, मानस प्रतिष्ठानच्या दीपा पाटील उपस्थित होते.



'पीसीपीएनडीटी' कायद्याकरिता राज्य शासनाचे सल्लागार असलेले डॉ. आसाराम खाडे आणि यूएनएफपीएच्या राज्य समन्वयक अनुजा गुलाटी यांनी नवनिर्वाचित समिती सदस्यांना गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम २००३ (पीसीपीएनडीटी) तसेच राज्यातील सद्यस्थितीची माहिती देत तपासणी व सनियंत्रणबाबत प्रशिक्षण दिले.

राज्यात मुलींचे लिंगगुणोत्तर वाढण्यासाठी राज्य तपासणी व सनियंत्रण समितीच्या सदस्यांनी राज्याचा दौरा करावा आणि या दौऱ्याची सुरुवात कमी लिंगगुणोत्तर असलेल्या जिल्हयापासून व्हावी, असा निर्णय बैठकीत घेण्यात आला. या दौऱ्याकरिता सार्वजनिक आरोग्य विभागाकडून तपासणी संच तयार करण्यात येणार असून, यात यूएनएफपीए सहकार्य करणार आहे.



**राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने स्थापन केलेल्या राज्य तपासणी व सनियंत्रण समितीची कार्यशाळा तसेच पहिली बैठक मुंबईत नुकतीच पार पडली.**





# मानवी तस्करी, एनआरआय विवाहांबाबतच्या पुस्तिकांचे नवी दिल्ली येथे प्रकाशन

साद प्रतिनिधी


नवी दिल्ली येथे २६ जुलै रोजी राज्य महिला आयोगाच्या वतीने भरविण्यात आलेल्या 'एनआरआय विवाह समस्या आणि उपाय आणि मानवी तस्करी' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेत याच विषयावरील दोन स्वतंत्र पुस्तिकांचे प्रकाशन केंद्रीय परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज, महिला आणि बालकल्याण मंत्री मनेका गांधी, परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव ज्ञानेश्वर मुळे यांच्या हस्ते करण्यात आले.

सध्या एनआरआय विवाहांतील समस्या ही देशातील प्रमुख सम स्यांपैकी एक बनली आहे. परदेशी राहणारा पती हवा, या लालसेपोटी फारशी खातरजमा न करताच मुलींचे विवाह अनिवासी भारतीयांशी करून दिले जातात. पुढे हे पती आपल्या पत्नींना सोडून तरी देतात वा त्यांचा अनन्वित छळ करतात. अशा पतींवर कायदेशीर कारवाई करणे हे प्रशासनाची डोकेदुखी होऊन बसते. तसेच, पीडित मुलींचे भवितव्यही अंधःकारयुक्त होते. हे टाळण्यासाठी परिषदेत चर्चा करण्यात आली.

याच अनुषांगाने एनआरआय विवाहांबाबत इंग्रजीतून पुस्तिका काढण्यात आली आहे. या पुस्तिकेत एनआरआय विवाहांतील समस्यांचा आढावा घेण्यात आला आहे. कोणकोणत्या प्रकारच्या समस्या येतात, त्याचे प्रश्ननिहाय विवेचन करण्यात आले आहे. या संदर्भात न्यायालयांत लढल्या गेलेल्या खटल्यांचे संदर्भ, त्यांचे तपशील देण्यात आले आहेत. ही माहिती एखाद्या पीडितेला आपला खटला लढविण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.




एनआरआय व्यक्तीशी विवाह करताना कोणत्या गोष्टी कराव्यात, कोणत्या करू नयेत, याचे काही मुद्दे दिले आहेत. उपवर मुलींच्या पालकांना उपयुक्त ठरेल. विवाह ठरविताना या माहितीचा नक्कीच उपयोग होईल. एखादी मुलगी परदेशात वा देशातही समस्याग्रस्त झाल्यास तिला मदत कशी मिळू शकते, याची माहिती देण्यात आली आहे. विविध देशांतील भारतीय दूतावास, सरकारी संस्था, स्वयंसेवी संस्था यांचीही माहिती या पुस्तिकेत उपलब्ध आहे. तसेच, विविध देशांतील त्यातही प्रामुख्याने अमेरिका आणि कॅनडा या देशांतील कायदेशीर तरतुदींचीही माहिती या पुस्तिकेत देण्यात आली आहे.




महिला तस्करीविषयक माहिती पुस्तिका – महिला आणि मुलांची तस्करी ही देखील एक प्रमुख समस्या आहे. या विषयावरही नवी दिल्लीतील परिषदेत चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. महिलांची तस्करी विविध कारणांसाठी केली जाते. प्रमुख्याने गरीब वर्गातील महिला या तस्करीच्या शिकार ठरतात. अवैध एजंटांमार्फत या महिलांना आखाती देशांत वा इतरत्र पाठविण्यात येते. तेथील गृहोपयोगी उपकरणे वापरण्याचे तंत्र या महिलांना अवगत नसते. भाषेची अडचण असते. शिक्षणाअभावी परवड होते. अशा स्थितीत या महिला असहाय बनतात. कोणी तरी मदत केल्याखेरीज त्यांना तेथून सुटणे अशक्य होते.

अशीच स्थिती तरुणांची होते. तस्करीला बळी पडणारे बहुतेक तरुण १८ ते २२ वयोगटातील असतात. अर्ध वा अल्पशिक्षित तरुणांनाच या मोहात फसविण्यात जाते. जहाजावर नोकरीचे आमिष दाखवून या मुलांना डिझेल आणि अमली पदार्थांच्या तस्करीत अडकविले जाते. दुसऱ्या देशात जाताच ही मुले तेथे पकडली जातात आणि तुरुंगात खितपत पडतात. अमली पदार्थांच्या तस्करीसाठी आखाती देशांत फाशीची शिक्षा आहे, अशा मुलांचा हकनाक बळी या तस्करीपायी जातो. या गंभीर समस्येला वाचा फोडण्यासाठी आणि त्यावर काही उपाययोजना सुचविण्यासाठी मानवी तस्करीविषयक पुस्तिका तयार करण्यात आली आहे. या पुस्तिकेत मानवी तस्करीच्या समस्येचा आढावा घेण्यात आला आहे. मानवी तस्करीला बळी पडणाऱ्या बहुतेक महिला तळागाळातील, वंचित, शोषित वर्गातील, आदिवासी समुदायातील असतात, हे लक्षात घेऊन त्याबाबतचा उहापोह पुस्तिकेत करण्यात आला आहे. तज्ज्ञांचे लेख आहेत. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निवाडे, ऑनलाइन तस्करी यांचीही माहिती पुस्तिकेत देण्यात आली आहे.

# सशक्त समाज निर्मितीसाठी महिलांनी सबळ झाले पाहिजे

## राज्य महिला आयोगाच्या सदस्य देवयानी ठाकरे यांचे मत

**धुळे :** महिलांमध्ये कायदेविषयक जनजागृती वाढली आहे. महिलांना कायद्याची माहिती होणे ही काळाची गरज आहे. राज्य सरकारसह राज्य महिला आयोगाला हेच अपेक्षित आहे. सशक्त समाजरचनेसाठी महिला सबळ असणे गरजेचे आहे, असे मत आयोगाच्या सदस्य देवयानी ठाकरे यांनी नुकतेच व्यक्त केले.

येथील आयएमए हॉस्पिटलमध्ये नुकतेच महिलांसाठी कायदेविषयक कार्यशाळा झाली. त्या वेळी त्या बोलत होत्या. या वेळी विधी सेवा प्राधिकरणाचे न्या. जे. ए. शेख, राज्य महिला आयोगाचे जिल्हा समन्वयक ॲड. चंद्रकांत येशीराव, महिला व बालकल्याण अधिकारी बागूल तसेच दिग्नाग फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

देवयानी ठाकरे म्हणाल्या, सशक्त समाजरचेनासाठी महिला सबळ असणे गरजेचे आहे; परंतु बऱ्याचदा महिलांना त्यांच्या हक्कासह अधिकारांची जाणीव नसते. त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. गेल्या काही वर्षांत महिलांमध्ये कायदेविषयक जागृती वाढली आहे. हक्क आणि अधिकारांची जाणीव महिलांमध्ये रुजविली जात आहे. त्यामुळे महिला कायदेसाक्षर होत आहेत.

न्या. जे. ए. शेख म्हणाले, विधी सेवा प्राधिकरणातर्फे महिलांना मोफत कायदेविषयक सल्ला दिला जातो. शिवाय न्यायालयीन प्रक्रियेबद्दलही मोफत मार्गदर्शन केले जाते. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याची सविस्तर माहितीही न्या. शेख यांनी दिली.

### कायद्याची माहिती

ॲड. येशीराव यांनी महिलांविषयक कायद्यांबाबत मार्गदर्शन केले. तसेच, ४९८ सारख्या कलमांचा दुरुपयोग कसा होतो, याची माहिती दिली. या वेळी महिलांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन करण्यात आले. महिलांसाठी असलेल्या विविध कायद्यांचीही माहिती या वेळी देण्यात आली. राहुल जगताप यांनी प्रास्ताविक केले. संदीप पगारे यांनी आभार मानले. कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी दीपक लोंढे, नितीन मोरे, सुनील सरदार, छाया पाटील यांच्यासह बचतगटांच्या सदस्यांनी प्रयत्न केले.



# 'पतीसोबत न राहण्याची निवड करण्याचा स्त्रीला अधिकार'

## सर्वोच्च न्यायालयाचा आदेश

**नवी दिल्ली :** एका मुस्लिमाने हिंदू मुलीशी लग्न केलं. त्यांचा प्रेमविवाह होता. तिच्यासाठी त्याने हिंदू धर्मही स्वीकारला. पण तिने मर्जीने लग्न केलं तरी तिला आता पालकांसोबत राहायचं आहे. सर्वोच्च न्यायालयाने तिला तशी परवानगीही दिली.

रायपूर येथे फेब्रुवारीमध्ये हा विवाह झाला. ३३ वर्षीय आर्यन आर्य याचं लग्न २३ वर्षीय जैन मुलीशी झालं. त्याने १७ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयात मुलीच्या पालकांविरोधात 'हेबियस कॉर्पस' (प्रत्यक्षीकरण) याचिका दाखल केली. तिचे पालक आणि एक हिंदू संघटना बळजबरीने त्या दोघांना वेगळे करत असल्याचा आरोप त्याने केला.

सरन्यायाधीश दीपक मिश्रा, न्या. ए. एम. खानविलकर आणि डी. वाय. चंद्रचूड यांनी आर्याचे वकील निखील नायर यांचा युक्तिवाद ऐकला आणि मुलीला २७ ऑगस्ट रोजी कोर्टात हजर करण्याचे आदेश पोलीस अधीक्षकांना दिले. २७ ऑगस्टला सोमवारी तिच्याशी न्यायाधीश काही बोलण्याच्या आत, राज्याचे महाधिवक्ता जुगल किशोर गिल्डा म्हणाले, याचिकाकर्त्याचा दोन वेळा घटस्फोट झाला आहे आणि त्याने ते लपवून ठेवलं. त्यामुळे हे लग्न बेकायदा ठरतं.

मुलीने वारंवार कोर्टाला सांगितलं की तिने जरी त्या पुरुषाशी लग्न केलं असलं तरी तिला तिच्या पालकांसोबत राहायचं आहे आणि तिच्यावर कोणताही दबाव नाही.

'मुलगी सज्ञान आहे. तिला तिच्या मर्जीने राहण्याचं स्वातंत्र्य आहे. तिला तिच्या पतीकडे जायचं नसेल तर हे प्रकरण विवाहासंदर्भातलंच होतं आणि ते योग्य कोर्टाकडे वळतं करता येऊ शकतं,' असं सांगत मुलीला तिच्या इच्छेनुसार तिच्या पालकांकडे राहण्याचा अधिकार कोर्टाने मान्य केला.

**(सौजन्य : महाराष्ट्र टाइम्स)**

---

# सप्टेंबरमध्ये पोषण महिना

साद प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या वतीने सप्टेंबर महिना पोषण महिना म्हणून साजरा करण्यात येणार आहे. त्या निमित्त देशभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

घरोघरी पोषण महोत्सव असे ब्रीदवाक्य त्यासाठी तयार करण्यात आले आहे. प्रत्येक घरोघरी पोहोचून कुपोषणाविषयी जनजागृती करण्याचे उद्दिष्ट या मोहिमेंतर्गत ठेवण्यात आले आहे.

गर्भावस्थेत महिलांनी घ्यायची काळजी, स्तनपानाचे महत्त्व, अनिमियाप्रतिबंधक उपाय या विषयी माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. या खेरीज मुलींच्या पालनपोषणाचे महत्त्व, विवाहायोग्य वय, मुलांच्या वाढीचे योग्य निरीक्षण, स्वच्छतचे महत्त्व पटवून देण्यावरही भर देण्यात येणार आहे. महिनाबर ही मोहीम चालेल. केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते अनिमियाविरोधी मोहिमेचा प्रारंभ करण्यात येणार आहे.

निती आयोग, महिला आणि बाल कल्याण मंत्रालय, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, पेयजल आणि स्वच्छता मंत्रालय, पंचायत राज, ग्रामविकास, नगरविकास, मनुष्यबळ विकास, माहिती आणि प्रसारण, ग्राहक कल्याण मंत्रालय, अन्न आणि नागरी पुरवठा मंत्रालय, आदिवासी विकास मंत्रालय, अल्पसंख्याक मंत्रालय आणि आयुष ही मंत्रालये या अभियानात सहभागी होणार आहेत.

कुपोषणाविरोधात पोषण अभियानाचा प्रारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ मार्च रोजी झुनझुनू येथे केला होता. या अभियानासाठी नऊ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सहा वर्षांपर्यंतच्या मुलांमधील खुरटेपण सध्याच्या ३८.४ टक्क्यांवरून २०२२पर्यंत २५ टक्क्यांवर आणण्याचे उद्दिष्ट या अभियानांतर्गत ठेवण्यात आले आहे.

# राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी रेखा शर्मा

साद प्रतिनिधी

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी केंद्र सरकारने रेखा शर्मा यांची नियुक्ती केली आहे. रेखा शर्मा या पूर्वी आयोगाच्या प्रभारी अध्यक्ष होत्या. ललिता कुमारमंगलम यांचा कार्यकाळ संपल्यानंर २०१७ पासून शर्मा यांच्याकडेच अध्यक्षपदाचा कार्यभार होता.

राष्ट्रीय महिला आयोगाया सदस्य म्हणून काम करताना रेखा शर्मा यांनी कारागृहे, मुलींची वसतिगृहे यांचा अनेकदा दौरा केला. महिला हक्कांबाबत त्या सक्रिय आहेत. आयोगाच्या प्रभारी अध्यक्ष असताना त्यांनी महिलांविरोधातील गुन्ह्यांबाबत स्वतःहून कारवाई केली आहे, तसेच चौकशी समित्या स्थापन केल्या. पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीवेळी झालेल्या हिंसाचाराच्या चौकशीचे आदेशही शर्मा यांनी दिले होते.

महिलांविरोधात होणाऱ्या सायबर गुन्ह्यांविरोधात जनजागृती करण्याचेही काम शर्मा यांनी केले आहे. शर्मा ५४ वर्षांच्या असून, त्या मूळच्या हरियाणातील पंचकुला येथील रहिवासी आहेत. त्या डेहराडून येथील प्रसिद्ध डीएव्ही कॉलेजच्या विद्यार्थिनी आहेत. त्यांनी राज्यशास्त्र, इतिहास आणि इंग्रजी साहित्य या विषयांतील पदवी घेतली आहे. त्याचबरोबर मार्केटिंग आणि जाहिरात, फॅशन डिझायनिंग क्षेत्रातील डिप्लोमा आणि कम्प्युटर सिस्टीम मॅनेजमेंटम धील पदव्युत्तर डिप्लोमा केला आहे. त्यांचे पती लष्करी अधिकारी आहेत.

सैनिकांच्या पत्नी आणि मुलांच्या कल्याणासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबविले आहेत. हरियाणा सरकारच्या ग्राहक आणि तक्रार निवारण मंचाच्या त्या सदस्य आहेत. चारवी नावाची इव्हेंट मॅनेजमेंट संस्था त्या चालवतात. त्याचबरोबर हरियाणा महिला उत्थान समिती नावाची त्यांची स्वयंसेवी संस्थाही आहे. ती महिला सबलीकरणासाठी काम करते.



**“ या नियुक्तीमुळे मला अतीव आनंद झाला आहे. महिलांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी मी सातत्याने काम करत राहीन. – रेखा शर्मा,**

अध्यक्ष, राष्ट्रीय महिला आयोग

## तोंडओळख कायद्याची

### कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५

**हा कायदा हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करतो.तसेच पुरुषांच्या विरोधात नसून मानवतावाद, कायदा, नैतिकता आणि न्याय यांच्याशी विसंगत वर्तन करणाऱ्या व्यक्तींविरोधात आहे. या कायद्याचे स्वरूप धर्मनिरपेक्ष आहे.**

| कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय? | |
|---|---|
| शारीरिक छळ | मारणे, चावणे, लाथाडणे, ठोसे मारणे, ढकलणे, शारीरिक अत्याचार इत्यादी. |
| शाब्दिक किंवा भावनिक छळ | अपमानास्पद उपहासात्मक बोलणे, नावे ठेवणे, नोकरीस प्रतिबंध इत्यादी. |
| आर्थिक छळ | घरगुती गरजांसाठी पैसे, भाडे, हातखर्च इत्यादी न देणे, पगार, उत्पन्न जबरदस्तीने घेणे इत्यादी. |
| लैंगिक छळ | जबरदस्तीने संभोग करणे, अश्लील चित्रफीत दाखवणे, बाल लैंगिक शोषण करणे इत्यादी. |

| कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत स्त्रियांना मिळणारे आदेश | |
|---|---|
| कलम १४ | अन्वये संयुक्त समुपदेशन/समझोते या कायद्याच्या अंतगर्त उपलब्ध आहेत. |
| कलम १८ | अन्वये संरक्षण आदेश कोणत्याही प्रकारची घरगुती हिंसा न करणे कामाच्या ठिकाणी प्रवेश न करणे, संपत्ती न विकणे. |
| कलम १९ | अन्वये निवासाचा आदेश स्त्रियांना घराबाहेर काढणे किंवा त्यांना घरात राहण्यास अडथळा आणणे. |
| कलम २० | अन्वये पोटगीचा आर्थिक आदेश राहणीमानाच्या दृष्टीने पुरेशी उचित, योग्य व वाजवी आर्थिक लाभाची रक्कम. |
| कलम २१ | मुलांच्या ताब्याचा आदेश. |
| कलम २२ | अन्वये नुकसान भरपाई आदेश. व्यथित व्यक्तीला झालेली ईजा,मानसिक छळ व भावनिक क्लेश यासाठी नुकसान भरपाई. |

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ – २६५९०८७८

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com

प्रति / TO

If undelivered, pls return to,
महाराष्ट्र राज्य महिला आयोग,
मुंबई,
गृहनिर्माण भवन म्हाडा
बिल्डिंग, कलानगर,
वांद्रे (पू.),
मुंबई ४०००५१